| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २८९ वा | मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26


संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# राहुल गांधींच्या अडचणी वाढणार?

## नरवणेंच्या पुस्तकाच्या वादावर प्रकाशन कंपनीचा मोठा खुलासा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दरम्यान माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकावरून मोठा गदारोळ झाल्याचे पाहायला मिळाले. मनोज नरवणे यांचे 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' हे पुस्तक अद्याप प्रकाशित झालेले नाही. मात्र, याच पुस्तकातील काही उल्लेखांवरून राहुल गांधी लोकसभेत चांगलेच आक्रमक झाले होते. त्यामुळे संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चांगलाच गोंधळ झाला होता.**






जनरल नरवणे यांच्या या पुस्तकाचं दोन वर्षांपासून प्रकाशन रखडलेले असल्याचेही सांगितले जाते. एम.एम. नरवणे यांचे हे पुस्तक प्रकाशित होऊ दिले जात नसल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी केला आहे. दरम्यान या पुस्तकाच्या प्रकाशनावरून वाद सुरू असतानाच पुस्तकाची प्रकाशन कंपनी पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने निवेदन सादर करत स्पष्टीकरण दिले आहे.

मनोज नरवणे यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या पुस्तकाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने म्हटले आहे की, हे पुस्तक अद्याप प्रकाशित झालेले नाही, पुस्तकाच्या प्रकाशनाचे सर्व हक्क आमच्याकडे असून आतापर्यंत या पुस्तकाच्या कोणत्याही प्रती, छापील किंवा डिजिटल स्वरूपात प्रकाशित, वितरित, विकल्या किंवा इतर कोणत्याही प्रकारे जनतेसाठी उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. या बरोबरच पुस्तकाचा कोणताही भाग आमच्याकडून कुठेही सार्वजनिक करण्यात आलेला नाही. त्यामुळे पुस्तकाचं कोणत्याही प्रतीचे प्रिंट किंवा डिजिटल स्वरूपात प्रसारण करणं हे कॉपीराइटचे उल्लंघन आहे.

तसेच पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने निवेदनात असा इशारा देखील दिला आहे की, सध्या प्रसारित होत असलेल्या पुस्तकाच्या कोणत्याही आवृत्तीत कॉपीराइट उल्लंघन आहेत आणि त्या त्वरित बंद केल्या पाहिजेत. तसेच पुस्तकाच्या बेकायदेशीर आणि अनधिकृत प्रसाराविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्याचा इशारा पुस्तक प्रकाशन हाऊसने दिला आहे.

### अनधिकृत प्रती लीक झाल्याचा आरोप, गुन्हा दाखल

दरम्यान, समोर आलेल्या वृत्तानुसार, या पुस्तकाच्या अनधिकृत प्रती लीक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्या ऑनलाइन प्रसारित झाल्याचा आरोप करण्यात आला असून या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी एफआयआर नोंदवला असल्याची माहिती समोर आली आहे.

**जनरल नरवणे यांच्या पुस्तकात नक्की काय?**

जनरल नरवणे यांनी आत्मचरित्रात त्यांच्या ४० वर्षांच्या लष्करी सेवेचा अनुभव मांडला आहे. 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' असे या पुस्तकाचे नाव आहे. जानेवारी २०२४ मध्ये या पुस्तकाचे प्रकाशन होणार होते. मात्र, त्यातील दोन प्रमुख विषयांवरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला. डिसेंबर २०२३ मध्ये पीटीआय वृत्तसंस्थेने त्यातील काही उतारे प्रसिद्ध केल्यानंतर भारतीय लष्कराने या पुस्तकाची तपासणी (रिव्ह्यू) सुरू केली. या उताऱ्यांमध्ये २०२० साली भारत व चीन यांच्यात निर्माण झालेल्या तणावाचा उल्लेख होता. त्यावेळी पूर्व लडाखमधील भागात चिनी रणगाडे भारतीय चौक्यांच्या अगदी जवळ आले होते. अत्यंत तणावाच्या क्षणी भारतीय राजकीय नेतृत्वाकडून (पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री) स्पष्ट आदेश मिळण्यास विलंब झाला आणि शेवटी निर्णय घेण्याचा अधिकार लष्करावरच सोपवण्यात आल्याचे पुस्तकात नमूद आहे.

त्याशिवाय २०२३ मध्ये लागू करण्यात आलेल्या 'अग्निपथ' भरती योजनेबाबत सशस्त्र दलांमध्ये झालेल्या चर्चांचा तपशीलही या पुस्तकात असल्याचे सांगितले जात आहे.

**पुस्तकाचे प्रकाशन कशामुळे रखडले?**

जनरल नरवणे यांचे चरित्र २०२४ मध्ये प्रकाशित होणार होते, परंतु गेल्या दोन वर्षांपासून त्याचे प्रकाशन रडखडले आहे. त्यामागचे कारण म्हणजे– लष्कर आणि संरक्षण मंत्रालयाकडून त्याची छाननी केली जात आहे. भारतीय संरक्षण दलाच्या नियमांनुसार, लष्करी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना कोणत्याही स्वरुपात सेवेशी संबंधित बाबी प्रसारमाध्यमांना देण्यास मनाई आहे. तसेच, केंद्र सरकारची पूर्वपरवानगी न घेता अशा स्वरूपाचे पुस्तक किंवा कोणताही दस्तऐवज प्रकाशित करण्यासही बंदी आहे. त्याशिवाय सेवेत असलेले अधिकारी केंद्र सरकारच्या पूर्वसंमतीशिवाय राजकीय प्रश्नांशी संबंधित, सेवाविषयक बाबींवर किंवा लष्करी विषयांवर आपले मत मांडणारे व्याख्यान देऊ शकत नाहीत. नियमांनुसार, 'सेवा माहिती' आणि 'सेवाविषयक बाबी' या संज्ञांमध्ये सशस्त्र दल, संरक्षण व्यवस्था तसेच केंद्र सरकारचे परराष्ट्र संबंध यासंबंधीची माहिती व विषयांचा समावेश होतो. अधिकाऱ्यांच्या मते, सशस्त्र दलातील एखाद्या व्यक्तीने आपल्या सेवेशी संबंधित नसलेले साहित्यिक अथवा कलात्मक स्वरूपाचे पुस्तक लिहिलेले असल्यास त्यावर हे नियम लागू होत नाहीत.

# उपमुख्यमंत्रीपदाचा पदभार सुनेत्रा पवार यांनी स्वीकारला

## अजितदादांच्या आठवणीने झाल्या भावूक!





**मुंबई/प्रतिनिधी:** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली. अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्रिपदासाठी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी लोकभवनवर साध्या पद्धतीने झाला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. यानंतर आता सुनेत्रा अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी सुनेत्रा पवार या अजितदादांच्या आठवणीने भावूक झाल्याचे म्हटले जात आहे.

सुनेत्रा अजित पवार यांनी एक्सवर एक पोस्ट लिहून भावनांना वाट मोकळी करून दिली. आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारत असताना विश्वासाची, कर्तव्याची आणि त्यागाची जाणीव सुद्धा आहे. मा. अजितदादांनी आयुष्यभर महाराष्ट्राच्या जनतेसाठी झटत विकासाचा जो ध्यास घेतला, तोच माझ्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे, असे सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे.

दादांची कार्यशैली, निर्णयक्षमता आणि लोकांशी असलेले आत्मीय नाते, हेच बळ घेऊन मी पुढील वाटचाल करणार आहे. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांना पूर्णत्व देणे, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणे, हीच माझी प्राथमिकता असेल. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही; पण त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि अधिक सक्षम महाराष्ट्र घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी नक्की करेन. या कठीण प्रसंगी जनतेने दिलेले प्रेम, आधार आणि विश्वास हेच माझे सामर्थ्य आहे. त्यांच्या स्मृतीपुढे आज मी एकच वचन देते की, महाराष्ट्राच्या हितासाठी निष्ठेने आणि समर्पणाने कार्य करत राहीन, असा शब्द सुनेत्रा अजित पवार यांनी दिला.

दरम्यान, प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात दर्शन घेत गणरायाचरणी नतमस्तक झाले. सिद्धिविनायकाचे मनोभावे दर्शन घेतले, पूजा केली. लोककल्याणाचे, विकासाचे कार्य निरंतर पुढे हाकण्यासाठी बळ दे, अशी प्रार्थना केली, अशी माहिती सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

# इयत्ता बारावी परीक्षा केंद्रांवरील बैठे पथकांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी घेतला आढावा

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यातील १०१ परीक्षा केंद्रांवर आजपासून इयत्ता बारावी परीक्षा सुरू झाली आहे. ही परीक्षा कॉपीमुक्त आणि भयमुक्त वातावरणात होण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवर तीन अधिकारी, कर्मचारी यांचे बैठे पथक तैनात करण्यात आले असून या पथकामार्फत परीक्षा केंद्रांवर निगराणी ठेवण्यात येत आहे.

आज पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी जिल्हा परिषदेत इयत्ता बारावी परीक्षेसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष कक्षातून दूरदृश्य प्रणालीद्वारे सर्व बैठे पथकांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बैठे पथकांतील सदस्यांकडून परीक्षा केंद्रांवरील उपाययोजनांची माहिती घेतली.



तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे परीक्षा केंद्र परिसराची पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. बैठे पथकांतील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहून काम करावे. कोणत्याही परीक्षा केंद्रांवर व परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश देवू नये. एखाद्या परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कार्यवाही केली जाईल. भरारी पथकांच्या माध्यमातूनही विविध परीक्षा केंद्रांवर निगराणी ठेवण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

परीक्षा केंद्रांवर नियुक्त बैठे पथकातील सदस्यांनी एकाच ठिकाणी न थांबता परीक्षा केंद्रांच्या परिसरात कोणतेही गैरप्रकार होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षातून सातत्याने बैठे पथकांचा आढावा घेण्यात येईल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी सांगितले.

सामान्य प्रशासनाच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यावेळी उपस्थित होत्या.

### २३८ नवीन एसी लोकलपैकी पहिली नमुना लोकल अडीच वर्षांत येणार ट्रॅकवर

**मुंबई/प्रतिनिधी:** उपनगरीय रेल्वे सेवेसाठी २३८ नवीन एसी लोकल खरेदी करण्यात येणार आहेत. त्याची बोलीपूर्व बैठक नुकतीच झाली. त्यामुळे तांत्रिक व व्यावसायिक मुद्द्यांवर आवश्यक स्पष्टता आली असून, नमुना लोकल (प्रोटोटाइप ट्रेनसेट) सुमारे अडीच वर्षांत तयार होईल, अशी माहिती मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या (एमआरव्हीसी) वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या उपनगरीय मार्गावर अधिक संख्येने वातानुकूलित लोकल धावणार आहेत. यासाठी मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) तयारी पूर्ण केली आहे. त्यानुसार तब्बल २३८ एसी लोकल खरेदीसाठी गेल्या वर्षी निविदा जारी केली होती. एमयूटीपी-३ अंतर्गत ४७, तर एमयूटीपी-३ ए अंतर्गत १९१ एसी लोकल खरेदी होणार आहेत. यासाठी सुमारे १९ हजार २९३ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव आहे.

### प्रभात किरणे

जीभ,मन असावे अधीन
सोडता सैल घडती अनर्थ
सुख, समाधानाची होळी
जन्मून, जन्म जाती व्यर्थ
– इंजि. नागनाथ कलवले, लातूर

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



Z.P., P.S. निवडणुकीत सत्ताधारी महायुतीची आघाडी...

### चिमटा दयाचा



लातूर महानगरपालिकेत जी जादू चालली ती जि.प. चालली नाही ! कारण चव्हाणाचा प्रचार दौरा लातुरात झालाच नाही !!

# विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृद्धीसाठी दयानंद कला महाविद्यालयात गुलाब पुष्पाने स्वागत

**लातूर/प्रतिनिधी:** बारावी बोर्ड परीक्षेच्या तणावातून विद्यार्थ्यांनी मोकळा श्वास घ्यावा तसेच आनंदी, तणावमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडाव्यात, या उद्देशाने दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालयात प्रति वर्षाप्रमाणे बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन उत्साहात स्वागतपर कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य तथा केंद्र संचालक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष ललितभाई शाह व सचिव रमेश बियाणी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. हळुवार सुमधुर बासरीचे सूर, रंगीबेरंगी रांगोळ्यांची आकर्षक आरास, विविध फुग्यांनी सजवलेला परिसर व प्रवेशद्वार यामुळे संपूर्ण महाविद्यालयाचा परिसर मंगलमय झाला होता. या प्रसन्न वातावरणात बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

या स्वागत समारंभासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचा सल्ला दिला. परीक्षेबाबत काही विद्यार्थ्यांच्या मनात अनामिक भीती व हुरहुर असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावणे, आत्मविश्वास वाढवणे तसेच तणावमुक्त व भीतीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठीच हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित,प्रा. डॉ. दयानंद शिरूरे अधिक्षक श्री संजय व्यास,माजी राज्य मंडळ सदस्य डॉ. संदीपान जगदाळे, डॉ. गोपाल बाहेती, प्रा. जिगाजी बुद्रुके, प्रा. सुधीर गाडवे, प्रा. दशरथ ननावरे व,प्रा महेश जंगापल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, प्रा. दिनेश जोशी, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. शांता कोटे, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. अंजली बनसोडे, प्रा. रत्नाकर केंद्रे आदींनी विशेष परिश्रम घेतले.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## विकासाच्या मागे जनता...

राज्यातील जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. निवडणुका ह्या राज्यात होतच राहणार मात्र महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्यात लोकसभा, विधानसभा, महानगरपारिषदा, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा समजल्या जातात. त्यामुळे अशा महत्त्वाच्या निवडणुका पार पडल्या आहेत. आता ग्रामपंचयायत सह इतर निवडणुका होतच राहणार. आपण सर्व भारतीयांनी लोकशाही स्विकारली आहे. लोकशाहीत निवडणुकीस महत्त्व आहे. बऱ्याच वेळा लोकशाहीत वावरतो असे म्हणतात मात्र लोकशाहीच्या मुल्याचे जतन करीत नाही. हे दुर्दैव आहे. लोकशाहीत निवडणुकीत मतदार, मतदानापुर्वी काय करतात. कशाची मागणी होते. ग्रामीण भाषेत बोटी व चपटी अधिक चालते असे सर्रास बोलतात. काही वेळा चुकीचा मार्ग उमेदवार व मतदार निवडतात त्यावेळी लोकशाहीचे मुल्य आठवत नाहीत. काही वेळा मतदान विकू नका. असेही आवाहन केले जाते. याचा अर्थ मत विकणारी मंडळी आहे म्हणून ते करू नका असे आवाहन केले जात असावे. लोकशाहीत जनतेचा प्रत्येक राष्ट्रीय संपत्तीवर अधिकार आहे. त्यांची जपणूक करणे कर्तव्य आहे. मुळात लोकशाहीतील मुल्य विसरत चाललो आहोत त्यामुळे अनेक बाबी व्हायलर होताना दिसून येतात. विकत घ्या. किती मिळतील. असे विविध बाबी उघड होताना दिसून येतात. मुळात लोकशाहीत लायक असले पाहिजे. समसमानता असली पाहिजे. केवळ बोलायाचे एक व करायाचे दुसरे असे होता कामा नये. लोकशाहीत राष्ट्रीय संपत्तीची उधळण होताना कोणीही रोखण्यासाठी पुढे येत नाही. मुळात आपल्या देशात प्रत्येकांचे काम राष्ट्रहीत जपने आहे. लोकशाहीत तरच आहेच. आपण ते पाळतो का? या बाबत आत्मपरिक्षण केले पाहिजे. त्याच प्रमाणे निवडणुका झाल्या की, काम संपले असे होत नाही. नुकतेच राज्यात नगरपरिषद व महानगरपालिकेची निवडणुक पार पडल्या. यातील पराजित झालेले आभार सहसा मानत नाहीत कारण ते दु:खी असतात मात्र विजयी झालेले तीन-तीनवेळा विजय हस्तगत गेलेले तर पुन्हा पाच वर्षांनीच समोर दिसतात. हे योग्य नाही. सेवक म्हणून ज्यावेळी व्रत स्विकारता त्यावेळी आपले कर्तव्य विसरून चालणार नाही. आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. अनेकदा काही दिल्याने मत दिले असे सेवक बोलताना दिसून येतात. ते योग्य नाही. मुळात कोणीही आता सेवक होताना दिसून येत आहे. एक तर असे उदा. दिसून येते. कसलाही समाजसेवकापनाचा गंध नाही. कधी समाजिक सेवा केली नाही. मात्र तो निवडून येतो तो कशाच्या जोरावर आला आहे हे तसे उघड सांगण्याची गरज नाही. याला दोष कोणाला द्यावयाचा? हा मोठा पेच आहे. असो आता वर म्हटल्या प्रमाणे महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. आता विकासाचे काय ते केले पाहिजे. दिलेले आश्वासाने पाळली पाहिजेत. सध्याला निवडून आलेला साडेचार वर्ष आपल्याच तंद्रित असतो तर मत देणारा कामात गुंतलेला असतो. निवडणुक काळात सर्व भागलेले असते. निवडणुक संपल्यावर आपल्या खिशातून सर्व करावे लागते. हे तर सर्वांना माहिती आहे. त्यामुळे मतदार राजांनी विचार केला पाहिजे. आपल्या जीववर म्हणजे आपल्या अमुल्य मतावर तो साडेचार वर्ष मजा मारीत आहे हे कधी लक्षात येणार? त्यामुळे निवडणुका ह्या दर पाच वर्षांनी परिक्षा म्हणून दिली जात आहे. नकला करून पास झाला का अन्य मार्गाने पास झाला. एकदा का पास म्हणजे उत्तीर्ण झाला की, पुन्हा साडेचार वर्ष निवांत असतो. हे नक्की! त्यामुळे राज्यात आता झाले ते झाले विकासाचे काय ते पाहीले पाहिजे. विकासाबाबत बोलले पाहिजेत. केंद्र व राज्य सरकार मोठ्या प्रमाणात थेट अनुदान देत असते.त्या अनुदानाचा उपयोग योग्य पद्धतीने झाला पाहिजे. काही झाले तरी अनुदानावर विकास साधता येतो. तसे पाहिले तर स्थानिक स्वराज्य संस्थेला उत्पन्न चांगले असते. त्याचा योग्य विनियोग होत नाही. त्यामुळे जे सरकार कडून अनुदान येते त्याचा तरी उपयोग विकासावर खर्च होणे अपेक्षित आहे. मुळात स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्या पाहिजेत. किंबहून झाल्या पाहिजेत. यासाठी नुतन सेवकांनी, विजयी उमेदवारांनी विचार केला पाहिजे. निवडणुका झाल्या की, सर्व काही मतभेद संपते. बऱ्याच वेळा वरिष्ठ नेते एक होतात मात्र खालचे कार्यकर्ते हे मतभेदाने वागतात हे योग्य नाही. गावाच, शहराचा विकास हा देशाचा विकास आहे. हे लक्षात ठेवले पाहिजे. आता नगरपरिषद, महानगरपालिका व जिल्हापरिषद या तिघामधील प्रतिनिधीनी मनलावुन विकास साधला तर गाव समृद्ध होतील. जनता सुखी व समाधानी दिसून येतील. ती होत नाही. साठ वर्षापासून त्याच त्या समस्या आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सोडवू शकलो नाहीत यामुळे लोकशाहीत आपण पात्र आहोत का? याचा मनाला विचार केला पाहिजे. विकासाच्या गप्पा मारावयाच्या, आश्वासने द्यायची व जाहिरनामा भर सभेत प्रसिद्ध करायाचा. त्यानुसार विकास साधला तर प्रश्नच शिल्लक राहणार नाहीत, समस्या समाप्त होतील. रस्ता, वीजेची सोय, पिण्याचे पाणी आदि मुलभूत प्रश्न दरवर्षी सोडविण्यासारख्या नाहीत. केवळ त्याची डागडुजी आवश्यक असते. आपल्या देशात समस्या त्याच, मात्र सेवक मात्र वेगवेगळे पाच वर्षांनी दिसून येतात. आमदार, खासदार, नगरसेवक आदि लोकप्रतिनिधी बदलेले आहेत मात्र समस्या त्याच आहेत. या बाबत विचार केला पाहिजे. कोणाची चुक आहे. याचा गंभीरतेने विचार केला पाहिजे. आपल्या नंतर स्वतंत्र झालेले देश आपल्यापुढे गेले आहेत. इतर देशाच्या मानाने आपल्या भारताची प्रगती खुपच कमी आहे. दरवर्षी पिण्याचा पाण्याचा प्रश्न आहे तो सोडविण्यासाठी हजारो, लाखो खर्च पाण्यात घातले जातात. यावर्षी रस्ता केला पुढील वर्षी पार खराब होतो. गुणवत्तेचे तीनतेरा वाजले जातात. याला जबाबदार कोण. सेवक, लोकप्रतिनधी? त्यामुळे आता शिक्षणाचे वाढते प्रमाण व ज्ञानी मतदारांनी विचार करण्याची गरज आहे. लोकशाहीचा नारा लावला जातो. मात्र लोकशाहीचे मुल्याचा विसर पडत आहे. काही मुल्य पायदली तुडविले जातात हे दु:खाने म्हणावे लागते. कधी-कधी आपण लोकशाहीस पात्र नाहीत का असा प्रश्न पडतो आहे.

## सुरक्षित इंटरनेट दिन विशेष...

# ऑनलाईन सुरक्षिततेसाठी घ्या खबरदारी !




सुरक्षित इंटरनेट दिन हा दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात साजरा केला जातो. या दिनाचा उद्देश विशेषतः मुले व तरुणांमध्ये इंटरनेटचा सुरक्षित, जबाबदार आणि सकारात्मक वापर करण्याबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे. तसेच, दरवर्षी उद्भवणाऱ्या नवीन ऑनलाईन समस्या व सध्याच्या सायबर सुरक्षेशी संबंधित आव्हानांबाबत समाजामध्ये जागरूकता वाढविणे हा देखील या दिनाचा महत्त्वाचा हेतू आहे.

शासकीय कामकाजात सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व लक्षात घेता, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी), जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या वतीने सिक्युअर युवर अकाऊन्टस ही विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश सर्व शासकीय कार्यालये, बँका, खाजगी संस्था तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या ऑनलाईन खात्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूक करणे हा आहे.

**सायबर सुरक्षेसाठी महत्त्वाच्या टिप्स :**

**१) इंटरनेट सुरक्षेसाठी टिप्स :**

केवळ विश्र्वसनीय व अधिकृत संकेतस्थळेच वापरा; कोणताही दुवा (Link)

उघडण्यापूर्वी त्याची खात्री करा.

HTTPS असलेल्या वेबसाइटचा वापर करा - URL च्या सुरुवातीस https://

असल्याची खात्री करा.

सार्वजनिक Wi-Fi वापरताना सावधगिरी बाळगा; शक्य असल्यास तझछ चा वापर करा.

मोबाईल, संगणक व अँटीव्हायरस सॉफ्टवेअर नेहमी अद्ययावत (Update) ठेवा.

**२) पासवर्ड सुरक्षेसाठी टिप्स :**

मजबूत (Strong) पासवर्ड वापरा - किमान १२ अक्षरे, मोठी-लहान अक्षरे, अंक व विशेष चिन्हांचा समावेश असावा.

प्रत्येक खात्यासाठी वेगळा पासवर्ड वापरा.

पासवर्ड ३ ते ६ महिन्यांतून एकदा बदला.

Two-Factor Authentication (2FA) अनिवार्यपणे सक्रिय ठेवा.

**३) बँक खात्यांची सुरक्षितता :**

OTP, PIN, CVV कोणालाही सांगू नका.

फिशिंग ई-मेल, बनावट SMS व फोन कॉलपासून सावध रहा.

बँकेच्या अधिकृत ॲपद्वारेच व्यवहार करा; थर्ड-पार्टी ॲप टाळा.

नेट बँकिंग व मोबाईल वॉलेटसाठी मजबूत पासवर्ड वापरा.

**४) UPI पेमेंट सुरक्षिततेसाठी टिप्स :**

अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या णझख रिक्वेस्ट स्वीकारू नका.

UPI PIN फक्त पैसे पाठवण्यासाठी असतो, पैसे मिळवण्यासाठी नाही.

फसवणुकीच्या कॉल्स किंवा मेसेजेसना प्रतिसाद देऊ नका.

Google Pay, PhonePe, Paytm इत्यादी ॲप्समध्ये सुरक्षा सेटिंग्ज सक्षम ठेवा.

**५) सोशल मीडिया खात्यांची सुरक्षितता :**

वैयक्तिक व संवेदनशील माहिती सार्वजनिक करू नका.

मजबूत पासवर्ड वापरून 2FA सुरू ठेवा.

फसव्या ऑफर्स, बक्षिसे व संशयास्पद लिंकपासून दूर रहा.

Facebook, Instagram, X (Twitter) इत्यादी प्लॅटफॉर्मवर Login Alerts सक्रिय ठेवा.

सुरक्षित व विश्वासार्ह सायबर अवकाश निर्माण करण्याच्या उद्देशाने, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत Information Security Education and Awareness (ISEA) प्रकल्प - टप्पा III राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत सायबर स्वच्छता व सायबर सुरक्षेबाबत (Cyber Aware Digital Citizen) जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात.

या उपक्रमांद्वारे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच शासकीय कर्मचारी यांना लक्ष्य केले जाते.

ISEA प्रकल्पांतर्गत सुरक्षित इंटरनेट दिन - १० फेब्रुवारी २०२६ निमित्त संपूर्ण भारतभर मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेसाठी आवश्यक जागरूकता साहित्य

https://staysafeonline.in/safer-internet-day येथे उपलब्ध आहे. सर्व

नागरिकांनी व शासकीय कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन ऑनलाईन

सुरक्षितता वाढवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

**जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी,**
**राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर**

# व्यक्त होता आले की व्यक्तिमत्व घडत जाते ! : गझलकार डॉ. मुकुंद राजपंखे



बाभळगाव : '' मोठी माणसंही कधी काळी आपल्या वयाची होती.तेंव्हा ते काय करत होते आणि नंतर त्यांनी काय केलं, याचा एक भला मोठा अशय आपल्या समोर येतो. मोठी माणसं अशीच कशी मोठी होतील बरं.कांही तरी जगावेगळं आणि जगासाठी करत राहिली असणार ती माणसं. पुस्तकं त्यांचा परिचय करुन देतात.तेंव्हा पुस्तकं वाचा लेकरंहो. पुस्तकं आणि पुस्तकातली माणसं.आपल्याला छत्रपती शिवजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि आजच्याच काळातली उदाहरणं द्यायची झाली तर आपल्याच परिसरात नायक म्हणून ज्यांच्याकडं पहावं असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. गोपिनाथराव मुंडे साहेब यांचा तरुणाईतला संघर्षाचा काळ मोठा क्रांतीकारी होता. तेव्हा, लेकरो हो ! यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवा. व्यक्त व्हायला शिका, त्या शिवाय व्यक्तिमत्व घडंत नाही ! '' असे प्रतिपादन प्रसिद्ध गझलकार डॉ. मुकुंद राजपंखे यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे विद्यार्थी परिषद उद्घाटन, वार्षिक बक्षीस वितरण आणि स्नेहसंमेलन उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून गझलकार राजपंखे बोलत होते. प्रारंभी लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या प्रतिमेस अभिवादन आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने उपस्थित होते.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विचारशील लेखन, सर्जनशीलता व सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविणारे हे भित्तीपत्रक उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरले. शैक्षणिक उपक्रमांना चालना देणाऱ्या या उपक्रमाबद्दल मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संचालक माने म्हणाले, '' शिक्षणाबरोबरच क्रीडा ही शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण व जिद्द निर्माण करणारी प्रभावी माध्यमे आहेत. बाभळगाव महाविद्यालयातील क्रीडा विभागाने अल्पकालावधीत विविध स्पर्धांमध्ये मिळवलेले यश, नियमित सराव व शिस्तबद्ध नियोजन याबद्दल विद्यापीठ स्तरावर त्यांचे कौतुक होत असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना क्रीडेत संधी देऊन त्यांना राज्य व विद्यापीठ स्तरावर पोहोचवण्याचे कार्य प्रेरणादायी आहे. त्या महाविद्यालयातून घडते'' यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष आयुब शेख, माजी विद्यार्थी समिती अध्यक्ष ॲड. व्यंकट नाईकवाडे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मंचावर संस्थेचे संचालक मारोती मस्के, क्रीडा संचालक डॉ.वैशाली माढेकर, शिक्षकेत्तर कर्मचारी सचिव बाळासाहेब देशमुख, विद्यार्थी पालक संपर्क समिती प्रमुख डॉ. अभिजीत बादाडे, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा. शिल्पा हलसीकर, विद्यार्थी परिषद सचिव कृष्णा धामणगावे, सहसचिव पूजा सवारे यांची उपस्थिती होती. विद्यार्थी परिषद प्रभारी डॉ. दशरथ भिसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयदेवी पवार, बक्षीस वितरण डॉ. मा.ना. गायकवाड आणि डॉ. नाना जाधव यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडूरंग मुंढे यांनी मानले.

वार्षिक बक्षीस वितरणासह शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. दुपारच्या सत्रामध्ये स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक, शेलापागोटे वाचन कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यामध्ये सांस्कृतिक विभाग सल्लागार समितीसह डॉ. रणजीत जाधव, डॉ. शाहूराज मुळे, ग्रंथपाल डॉ. महावीर कटके, प्रा.महारुद्र बिडवे, प्रा. संतोष कल्याणकर, प्रा. शितल खोत, विठ्ठल मुळे यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. अंगत कोते, प्रा. विवेक कदम, प्रा.सोपान डोपे, प्रा. विवेक जाधव, प्रा. विवेक गोस्वामी, प्रा. संदिपान चवले, प्रा. नंदा खरटमल, प्रा. बालिका गौंड, प्रा.अंकिता वाडकर, राजकुमार कांबळे, हनुमंत शिंदे, प्रकाश मेहरकर, माजी विद्यार्थी ओंकार सुरवसे, अंकुश थडकर, दत्ता फुलगामे, नितीन पाटील आणि बालाजी देशमुख यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## भारतात हे ५ प्रकारचे कर्करोग शांतपणे पसरत आहेत पाय; जाणून घ्या सुरुवातीची लक्षणे

जागतिक कर्करोग दिवस ४ फेब्रुवारी रोजी जगभरात साजरा केला जातो. या दिवशी अनेक संस्थांतर्फे अनेक कर्करोग जागरूकता शिबिरे आयोजित केली जातात. ज्यामुळे या आजाराची लक्षणं आणि प्रतिबंध याबद्दल जागरूकता निमर्ाण होते. जागतिक स्तरावार तसंच भारतातही कर्करोगाचे रुग्ण झपाट्यानं वाढत आहेत आणि आरोग्य तज्ञ वेळोवेळी इशारे देतात आणि जागरूकता वाढवतात.

भारतात काही प्रकारचे कर्करोग मूक किलर सारखे पसरत आहेत. कॅन्सरच्या सुरुवातीच्या लक्षणांकडे लोक अनेकदा दुर्लक्ष करतात. ते काही लक्षणांना किरकोळ आजार मानतात आणि सर्वात मोठी चूक करतात. कर्करोगाच्या लक्षणांची लवकर ओळख आणि योग्य उपचार हाच या प्राणघातक आजारापासून बचाव करण्याचा एकमेव मार्ग मानला जातो. तर, भारतीयांमध्ये सर्वात सामान्य असलेल्या पाच प्रकारचे कर्करोग आणि त्याच्या सुरुवातीच्या लक्षणांबद्दल जाणून घेऊया..

स्तन कर्करोग: भारतीय महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोग हा सर्वात सामान्य कर्करोग आहे,. तज्ञांचं म्हणणं आहे की, हा आजार आता केवळ वृद्ध महिलांपुरता मर्यादित राहिलेला नसून तरुण महिला देखील या आजाराला बळी पडत आहेत. जर तुम्हाला तुमच्या स्तनांमध्ये गाठ जाणवत असेल, स्तनाग्रातून स्राव जात असेल किंवा स्तनांच्या आकारामध्ये अचानक बदल जाणवत असेल तर ही सुरुवातीची लक्षणं असू शकतात. जर गाठ असली आणि ती वेदनादायक नसली तर हलक्यात घेऊ नका.

तोंडाचा कर्करोग: तंबाखूच्या सेवनामुळे भारतात आणि जगात तोंडाचा कर्करोग वेगाने पसरत आहे. तो प्रामुख्याने गुटखा, खैनी आणि तंबाखूच्या अतिसेवनामुळे होतो. तोंडाचा कर्करोग अनेकदा उशिरा आढळतो. कारण लोक सुरुवाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात. त्यांना पुरळ किंवा समान्य फोड समजतात. तोंडाच्या कर्करोगाचे मुख्य लक्षण म्हणजे तोंडात फोड येणे आणि ही फोड बरीच आठवडे बरे होत नाहीत. पांढरे किंवा लाल ठिपके, आवाजात कर्कशपणा किंवा गिळण्यास त्रास झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचं.

गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग: भारतीय महिलांमध्ये गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग हे मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आहे. वेळेवर तपासणी आणि लसीकरण करून तो रोखता येऊ शकतो. मासिक पाळी दरम्यान किंवा संभोगानंतर रक्तस्त्राव, सतत कंबरदुखी आणि असामान्य स्राव ही गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाची सामान्य लक्षणं आहेत.

फुफ्फुसांचा कर्करोग: धूम्रपान न करणाऱ्यांमध्येचही फुफ्फसांचा कर्करोग वेगाने पसरत आहे. तज्ञांचं म्हणणं आहे की वाढते प्रदूषण आणि निष्क्रिय धूम्रपान ही याची प्रमुख कारणे आहेत. फुफ्फुसाच्या कर्करोगाची लक्षणं बहुतेकदा जेव्हा आजार गंभीर टप्प्यात पोहोचतो तेव्हा दिसून येतात. लक्षणांमध्ये सतत खोकला, रक्तरंजित थुंकी, श्वास घेण्यास त्रास होणे आणि अचानक वजन कमी होणे यांचा समावेश असू शकतो.

कोलोरेक्टर कर्करोग: जंक फूड आणि कमी फायबरयुक्त आहारामुळे तरुणांमध्ये कोलोरेक्टर ( कोनल) कर्करोगाच्या घटनांमध्ये झपाट्यानं वाढ होत आहे. लोक अनेकदा पोटाच्या समस्यांना गॅस किंवा बद्धकोष्ठता म्हणून दुर्लक्ष करतात. शौचास त्रास होणे, रक्ताळलेले मल, पोटात पेटके येणे आणि भूक न लागणे ही कोलोरेक्टल कर्करोगाची लक्षणं आहेत.

## सावधान! तुम्ही देखील प्लास्टिकच्या डब्यात लोणचं साठवता? पडू शकते महागात

भारतीयांच्या ताटामध्ये डाव्या बाजूला जिभेचे चोलले पुरवण्यासाठी चटणी, कोथिंबीर, लोणचं हमखास असते. या सर्वामध्ये विशेष स्थान असते ते म्हणजे लोणच्याला. गोड तिखट आंबट चव असलेल्या लोणच्याचे कितीतरी प्रकार आहेत. थोडं तूप आणि गरम भातासोबत लोणचं खाणं ही एक आनंददायी गोष्ट आहे. बाजारात आंबा, लिंबू, मिरची, फणस, आवळा करवंद अशा एक ना अनेक प्रकारचे लोणचे उपलब्ध आहेत. परंतु आजकाल लोणचे साठवण्याची पद्धत बदलत चालली आहे. पूर्वी सिरेमिक भांड्यामध्ये लोणचे साठवले जायचे परंतु कालांतराने प्लास्टिकच्या बादल्या आणि बाटल्यांनी त्यांची जागा घेतली. मात्र, तज्ञांच्या मते, प्लास्टिकच्या डब्यात लोणचं साठवणे चांगले नाही.

लोणचे कितीही चविष्ट असलं तरी ते योग्यरित्या साठवले गेल नाही तर खराब होण्याची संभावना जास्त असते. शिवाय, त्यांचे दुष्परिणाम होतात. बरेच लोक लोणचे प्लास्टिकच्या बाटल्या किंवा जारमध्ये साठवतात कारण ते वापरण्यास सोपे असतात. मात्र, वेलनेस कोच मयूर म्हणतात की, प्लास्टिकचे जार लोणच्यासाठी चांगले पर्याय नाहीत. लोणचे थोडेसे आम्लयुक्त आणि खारट असतात. जेव्हा लोणचे त्यात साठवले जाते तेव्हा ते प्लास्टिकशी प्रतिक्रिया देतात. यामुळे, कालांतराने, प्लास्टिकमधील रसायने लोणच्यामध्ये जातात आणि आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असू शकतात.

प्लास्टिकच्या डब्यात लोणचे साठवणे सुरक्षित का नाही?

लोणचे लिंबाचा रस किंवा व्हिनेगर सारख्या आम्लयुक्त घटकांपासून बनवले जाते आणि प्लास्टिकचे कंटेनर नेहमीच आम्लयुक्त पदार्थांसाठी सुरक्षित नसतात. कालांतराने, आम्ल प्लास्टिकशी प्रतिक्रिया देऊ शकते, ज्यामुळे ँइअ किंवा ज्प्र्रत्ऱ्रू सारखी हानिकारक रसायने बाहेर पडतात. ही रसायने अन्नात मिसळू शकतात आणि हार्मोनल असंतुलन किंवा इतर आरोग्य समस्यांसारख्या गंभीर आरोग्य समस्या निर्माण करू शकतात. म्हणून, आम्लयुक्त, तेलकट किंवा गरम पदार्थ साठवण्यासाठी काच किंवा स्टेनलेस स्टीलसारख्या इतर पदार्थांपासून बनवलेले कंटेनर वापरणे सर्वात सुरक्षित आहे.

प्लास्टिक रंग आणि गंध दोन्ही शोषून घेते: प्लास्टिकचे डबे लोणच्याचा वास आणि रंग शोषून घेऊ शकतात. कारण प्लास्टिक छिद्रयुक्त असते आणि लोणच्यातील तेल आणि मसाले शोषू शकते. यामुळे लोणच्याची चव बदलू शकते आणि कंटेनर धुतल्यानंतरही त्यांचा वास येऊ शकतो.

कंटेनर त्यांचा आकार गमावतात: जर लोणचं तेलकट किंवा खारट असेल तर प्लास्टिकच्या बाटल्या किंवा कंटेनर कालांतराने त्यांचा आकार गमावू शकतात. ते आकुंचन पावू शकतात किंवा क्रॅक होऊ शकतात. तेल, मीठ आणि आम्ल यांचे मिश्रण प्लास्टिकच्या कंटेनरला नुकसान पोहोचवू शकते. दुसरीकडे, अगदी लहान भेग देखील लोणच्यामध्ये हवा प्रवेश करू शकते, ज्यामुळे ते लवकर खराब होते.

# हजारो वर्षे उलटली तरी मध खराब का होत नाही? कारण

मधाला अमर पदार्थ का मानलं जातं, यामागचं शास्त्र खूप रंजक आहे. हजारो वर्षांपूर्वी इजिप्शियन पिरॅमिड्समध्ये सापडलेला मध आजही खाण्यायोग्य स्थितीत आढळला आहे. वर्षानुवर्षे मध खराब न होण्यामागे ही ४ प्रमुख वैज्ञानिक कारणे आहेत:

**१. पाण्याचे अत्यल्प प्रमाण:** मधात पाण्याचे प्रमाण केवळ १७-१८% असते. नैसर्गिकरित्या मध हा खूप 'हायग्रोस्कोपिक' असतो, म्हणजेच तो आर्द्रता शोषून घेतो पण स्वत:मध्ये पाणी टिकवून धरत नाही. कोणत्याही जीवाणूंना



जगण्यासाठी पाण्याची गरज असते; मधात पाणीच नसल्यामुळे तिथे जीवाणूंची वाढ होऊ शकत नाही.**२. मधाची आम्लता** : मधाचा पीएच साधारणपणे ३.२ ते ४.५ च्या दरम्यान असतो. हे प्रमाण बऱ्यापैकी आम्लयुक्त आहे. इतक्या जास्त सिडिक वातावरणात कोणतेही सूक्ष्मजीव किंवा बॅक्टेरिया जिवंत राहू शकत नाहीत.

महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक निकालांमध्ये भाजप आणि महायुतीने मोठी आघाडी घेतली

**३. हायड्रोजन पेरोक्साईडची किमया :** मधमाश्या जेव्हा फुलांतील रस गोळा करतात, तेव्हा त्यांच्या पोटातील ग्लुकोज ऑक्सिडेज नावाचे एन्झाइम त्या रसात मिसळते. जेव्हा या रसाचे रूपांतर मधात होते, तेव्हा या एन्झाइममुळे 'हायड्रोजन पेरोक्साईड' तयार होतो. हे एक नैसर्गिक जंतुनाशक आहे, जे मधाला खराब होण्यापासून वाचवते.

४. मधमाश्यांची प्रक्रिया: मधमाश्या जेव्हा मधाच्या पोळ्यावर पंख फडफडावतात, तेव्हा त्यातील उरलेलं पाणीही बाष्पीभवनाने उडून जातं. यामुळे मध अधिक दाट आणि टिकण्यायोग्य बनतो. काही महत्त्वाच्या गोष्टी:

**साखरेचे खडे होणे:** जर तुमच्या मधात साखरेसारखे खडे झाले, तर त्याचा अर्थ मध खराब झाला असा होत नाही. हे मधाच्या नैसर्गिक गुणधर्मामुळे होते. कोमट पाण्यात मधाची बरणी ठेवल्यास तो पुन्हा पूर्वीसारखा होतो.

साठवणूक: जर मधाची बरणी उघडी ठेवली आणि त्यात ओलावा शिरला, तर मात्र मध खराब होऊ शकतो. त्यामुळे तो नेहमी हवाबंद डब्यात ठेवावा.

# हायपोग्लायसेमिया, शरीरात साखरेची पातळी कमी झाल्यावर...




हायपोग्लायसेमिया किंवा रक्तातील साखर कमी ही एक गंभीर स्थिती असू शकते जी दुर्लक्षित करू नये. त्याची लक्षणे ओळखणे आणि वेळेवर उपचार घेणे अत्यंत महत्वाचे आहे, विशेषतः मधुमेही रुग्णांसाठी. योग्य आहार घेणे, नियमितपणे रक्तातील साखरेची तपासणी करणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करणे हे हायपोग्लायसेमिया रोखण्याचे सर्वात प्रभावी मार्ग आहेत

सुरुवातीची किंवा सौम्य लक्षणे

मध्यम लक्षणे

गंभीर लक्षणे (आणीबाणी)

साखर कमी झाल्यास लगेच काय करावे?

हायपोग्लायसेमिया हा रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी एक वैद्यकीय संज्ञा आहे. जेव्हा शरीराला ऊर्जा प्रदान करणारा ग्लुकोज कमी होतो तेव्हा मेंदू आणि इतर अवयव योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत. रक्तातील साखर कमी झाल्यास सामान्यतः खालील लक्षणे दिसून येतात:

चरीरींहळ

महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक निकालांमध्ये भाजप आणि महायुतीने मोठी आघाडी घेतली

लघवी गळतीच्या या लक्षणांना महिलांनी दुर्लक्ष करू नये

१. सुरुवातीची किंवा सौम्य लक्षणे

जास्त भूक लागणे : अचानक तीव्र भूक (विशेषतः गोड पदार्थ खाण्याची तीव्र इच्छा)

अस्वस्थता आणि थरथरणे:

## कोणती लक्षणे जाणवतात?

हात आणि पाय थरथरणे किंवा शरीराच्या आत थरथरणे.

घाम येणे: कोणत्याही शारीरिक श्रमाशिवाय अचानक थंड घाम येणे.

धडधडणे : हृदयाचे ठोके अचानक वाढणे किंवा जाणवणे (धडधडणे).

चिडचिड: अस्पष्ट राग, अस्वस्थता किंवा अचानक मूड बदलणे.

२. मध्यम लक्षणे

चक्कर येणे किंवा डोके गरगरणे: अशक्तपणा आणि चक्कर येणे.धूसर दृष्टी: डोळ्यांसमोर अंधार असणे किंवा गोष्टी स्पष्टपणे न दिसणे.

एकाग्रतेचा अभाव: कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करू न शकणे किंवा गोंधळलेले वाटणे.

थकवा आणि अशक्तपणा: सुस्तपणा आणि आळस जाणवणे.

व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता पूर्ण करण्यासाठी आहारात या शाकाहारी पदार्थांचा समावेश करा

३. गंभीर लक्षणे (आणीबाणी)

जर रक्तातील साखरेचे प्रमाण खूप कमी झाले तर परिस्थिती धोकादायक बनू शकते:

बोलण्यात अस्पष्टता: मद्यधुंद व्यक्तीसारखे अस्पष्ट भाषण.

विचित्रपणे वागणे: भान हरपणे किंवा वेडेपणा करणे.

झटके: शरीराचा थरकाप होणे .

बेशुद्ध होणे: एखादी व्यक्ती कोमात जाते किंवा पूर्णपणे बेशुद्ध होते.शरीरात झिंकच्या कमतरताची लक्षणे, जाणून घ्या जर तुमच्या रक्तातील साखर कमी असेल तर ताबडतोब काय करावे? (१५:१५ चा नियम)

जर तुम्हाला वरील लक्षणे आढळली तर ताबडतोब हे **उपाय करा:**१५ ग्रॅम लवकर पचणारे कार्बोहायड्रेट्स घ्या: जसे की ३-४ ग्लुकोजच्या गोळ्या, १/२ कप फळांचा रस, किंवा १ चमचा साखर/मध.

१५ मिनिटे थांबा. नंतर, तुमच्या रक्तातील साखरेची पातळी तपासा.

जर तरीही कमी असेल तर: पुन्हा १५ ग्रॅम साखर घाला आणि १५ मिनिटांनी तपासा.

एकदा तुमच्या रक्तातील साखरेची पातळी सामान्य झाली की, तुमच्या रक्तातील साखर पुन्हा कमी होऊ नये म्हणून थोडेसे, संतुलित जेवण किंवा नाश्ता (जसे की दूध आणि बिस्किटे) घ्या.

**महत्वाची सूचना:** जर कोणी बेशुद्ध असेल तर त्यांच्या तोंडात काहीही घालण्याचा प्रयत्न करू नका; यामुळे गुदमरण्याची शक्यता आहे. ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या.

# पाकिस्तानला मिळाला धडा



जगाच्या कोणत्याही भागात अतिरेक्यांच्या हल्ल्यात निरपराध नागरिकांची हत्या होणे नक्कीच निषेधार्ह आहे; मात्र अशा अतिरेक्यांना पाकिस्तानने अनेक वर्षे 'सांभाळले' आहे. त्याची फळे आता त्या देशासमोर येत आहेत.

इस्लामाबादमधील एका मशिदीच्या बाहेर झालेल्या आत्मघातकी हल्ल्याने पाकिस्तानला जबर हादरा दिला आहे. या हल्ल्यात किमान ३१ जण मारले गेले आणि अनेक जण जखमी झाले. हल्लेखोरास मशिदीबाहेर अडवण्यात आले, तेव्हा त्याने लगेचच स्वत:च्या शरीराभोवती लपेटलेल्या स्फोटकांचा स्फोट घडवला असे प्रसिद्ध झालेल्या बातम्यांवरून समजले आहे. जर तो मशिदीत गेला असता, तर मृतांची संख्या अनेक पटींनी वाढली असती. हल्ल्यानंतर अनेक तासांनी 'इस्लामिक स्टेट' किंवा 'आय एस' या अतिरेकी संघटनेने या कृत्याची जबाबदारी स्वीकारली. 'टेलिग्राम' या समाज माध्यमावरून निवेदन करताना या संघटनेने हल्लेखोराचे छायाचित्रही प्रसिद्ध केले. चेहेरा झाकलेल्या हल्लेखोराच्या हातात एक बंदूकही दिसत आहे. सैफुल्ला अन्सारी असे नाव असलेल्या हल्लेखोराचे राष्ट्रीयत्व समजलेले नाही. 'वैचारिक शत्रू'च्या विरोधातील मोहिमेचा भाग म्हणून हा बॉम्बहल्ला घडवण्यात आल्याचे 'आयएस'ने म्हटले आहे. पाकिस्तान हा देश स्वत:ला इस्लामी म्हणवून घेतो तरीही त्याला ही संघटना शत्रू मानते. शुक्रवारच्या प्रार्थनेसाठी जमलेल्या नागरिकांना लक्ष्य करून त्यांची हत्या करणे यावरून संघटनेची क्रूर वृत्ती दिसते. या घटनेने भारताच्या दाव्यांना बळ दिले आहे.

**धोरण उलटले**

उझबेकिस्तानचे अध्यक्ष शावकत मिर्झियोयेव्ह पाकिस्तानच्या दौर्यावर असताना हा स्फोट घडवण्यात आला. पाकिस्तानची प्रतिमा आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक मलीन करण्याचा उद्देश त्यामागे असेल. त्याचप्रमाणे जास्तीत जास्त जणांचा मृत्यू व्हावा, या हेतूने शुक्रवारची निवड हल्लेखोरांनी केली. २००८ मध्ये इस्लामाबादमधील एका प्रख्यात हॉटेलच्या बाहेर स्फोटकांनी भरलेल्या वाहनाचा स्फोट घडवण्यात आला होता; त्यानंतरचा हा सर्वांत मोठा हल्ला मानला जात आहे. ताज्या हल्ल्यात ज्या मशिदीस लक्ष्य करण्यात आले ती शिया पंथीयांची आहे. पाकिस्तानात सुन्नी पंथाचे वर्चस्व आहे व शिया पंथीय अल्पसंख्याक आहेत. वांशिक म्हणण्यापेक्षा 'पंथीय' हिंसाचारात शिया पंथास लक्ष्य केल्याच्या अनेक घटना पाकिस्तानात गेल्या काही वर्षांत घडल्या आहेत. सामाजिक सलोखा निर्माण करण्यात व अल्प संख्याकांना संरक्षण पुरवण्यात पाकिस्तानी सरकार अपयशी ठरल्याची ती उदाहरणे आहेत. तेहरीक ए तालिबान पाकिस्तान किंवा 'आयएस' यांच्याकडून हे हल्ले केले जातात.

शुक्रवारच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानने प्रथम 'तालिबान'वर संशय व्यक्त केला होता; पण त्या संघटनेने लगेचच आपला त्यात हात नसल्याचे स्पष्ट केले होते. 'आयएस'ने जबाबदारी स्वीकारेपर्यंत पाकिस्तानच्या 'आय एस आय' या गुप्तहेर संघटनेस त्याचा मागमूस लागला नव्हता, हे त्यावरून सिद्ध होते. याचे कारण ही गुप्तहेर संघटना कायम भारतविरोधी कारवायांत गुंतलेली असते. आपल्या घरात काय चालले आहे याचा तिला पत्ता नसतो. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी स्फोटास अफगाणिस्तान व भारत जबाबदार असल्याचा निराधार दावा केला. तो हास्यास्पद व मूर्खपणाचा होता. भारताने तो फेटाळताना, देशातील अपप्रवृत्तींबद्दल इतरांना जबाबदार धरणे दुर्दैवी असल्याचा टोला लगावला. अफगाणिस्तानच्या सीमेलगत पाकिस्तान अतिरेकी विरोधी कारवाया राबवत आहे. पाकिस्तानात दहशतवादी कृत्ये घडवणार्या अतिरेकी संघटना अफगाणिस्तानात आहेत हे वास्तव आहे. तरीही त्या देशाने पाकिस्तानचा ताजा दावा फेटाळला आहे. भारतात हिंसक कारवाया करणार्या अनेक अतिरेकी संघटनांना पाकिस्तान अनेक वर्षे आश्रय देत आहे हे जगजाहीर आहे. इस्लामाबादेत २००८मध्ये मोठा स्फोट झाल्यानंतर दोनच महिन्यांनी याच संघटनांनी मुंबईवर हल्ला केला होता. त्या संघटना व हव्या असलेल्या अतिरेक्यांची नावे भारताने तेव्हा जगासमोर मांडली होती. पहलगामच्या हल्ल्यामागेही त्या संघटना होत्या हेही उघड झाले होते. तरीही पाकिस्तानने आपले वर्तन सुधारले नाही. अतिरेक्यांना पोसण्याची किंमत आता पाकिस्तान आपल्या नागरिकांचे प्राण गमावून चुकती करत आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



मागील काही वर्षांमध्ये सेक्शुएलिटीबद्दल लोक जास्त खुलून बोलू लागले आहे. आता या मुद्द्यांवर प्रत्येक व्यक्ती आपले विचार आणि आवड निवड व्यक्त करू लागला. आहे. अलैंगिक, हा एक असा शब्द आहे ज्याबद्दल आतापर्यंत तुम्ही फारच कमी किंवा कदाचित ऐकले ही नसेल. यात ते लोक येतात ज्यांना सेक्सची इच्छा नसते किंवा जे रिलेशनशिपबगैर संबंध बनवण्यास तयार होऊन जातात आणि ते लोक मुलगी असो की मुलगा दोघांशी संबंध बनवण्यास तयार होऊन जातात.डेमिसेक्शुअलचा अर्थ काय ? जर तुम्ही डेमिसेक्शुअल असाल तर तुम्हाला फक्त (क्रमशः)

## २ Joke — विनोद




सलमान : कॅटरीना सांग बरं भारतात चहा कुठं होतो?

कॅटरीना : सोपंच आहे, सगळ्या हॉटेलात.

## ३ Message — संदेश



Larkio k chakar may mat Parhna
"Dosto Q k..
Ye atey hy vEER ki tarha
....Lagty hy KHEER ki tarha
Chubhty hy TEER ki tarha Aur end main
Halat kr dety hy FAKEER ki tarha....

## ४ Thought — सुविचार

जगात काही अजरामर नाहीतुमच्या चिंतासुद्धा!

– अज्ञात




**संस्कृत सुभाषित**

**मृत्तिकानां सहस्रेण चोदकानां शतेन च।**
**न शुद्ध्यति दुराचारो भावोपहतचेतनः।।**

**अर्थ:**ज्याचे चित्त दुष्ट भावनांनी, विकारांनी भरलेले आहे असा दुराचारी हजार प्रकारची माती अंगाला फासून, तीर्थांत आंघोळ करून, शेकडो नद्यांत डुंबूनही शुद्ध होत नाही.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. ९



### आडवे शब्द

१. क्रिकेटमधील दोनशे
४. काळे मीठ
६. प्रधानमंत्री
९. चलनवलन
११. प्रमाणपत्र
१२. मुसलमान
१४. चाणाक्ष, हुशार
१६. वरपांगी
१८. पुष्पदल
१९. जोम, बळ
२०. शरम
२२. श्रीमंत
२५. गोदातीरावरील तीर्थस्थान
२७. श्रीरामाची चरित्रकथा
२८. पाचवा पांडव
३०. कपाळ फुटणे
३३. शरीर
३४. तेजस्वी, राजबिंडा
४०. गवत
४३. वाहणारी हवा
४४. शेराचा आठवा भाग
४६. धोबी
४७. निरूद्योगी
४९. चालढकल
५१. सुंदर तरुणी
५३. व्यर्थ
५४. गाय
५५. आचारी
५६. नवऱ्याची दुसरी पत्नी
५७. ओसाड (ग्रा.)
६०. ना नफा ना तोटा अशी स्थिती
६२. एकत्र येणे, गोळा होणे
६३. हिंदीत जवळ, इंग्रजीत उत्तीर्ण
६५. एकत्र होणे, गोळा होणे
६७. ही खरे तर साडेतीन हात एवढीच पुरे होते!
६८. जखमेवरील औषध
६९. पापडखार
७१. आधुनिक व्यवस्थापन तज्ज्ञांनाही उपयोगी असा समर्थांचा ग्रंथ
७३. व्रत
७५. नाहक द्वेष (ला.)
७७. सावध
७८. चलाख, चुणचुणीत
७९. निमग्न
८०. न दिसणारी जखम

### उभे शब्द

१. दुसरा
२. तृष्णा
३. मनाचा ओढा
४. गेलेला दिवस
५. भरभर
६. पर
७. सरोवर
८. किरकिरीचे हे वाद्य मुहूर्तालाच वाजल्यावर काम कसे होणार!
१०. हा आसूड हल्ली दाद देण्यासाठी प्रसिद्ध
११. नवरा (ग्रा.)
१३. पक्के आश्वासन
१५. जवळ, निकट
१७. रक्षण करणारा
१८. पर्ण
२१. जनमत, लोकनिर्णय
२२. टक्कर
२३. बडबड्या
२४. आई (ग्रा.)
२६. पवित्र, शंकर
२७. दानव
२८. पत्नी
२९. राजमहाल, प्रासाद
३१. पारा
३२. साखरपाकात मुरवलेला आवळा
३५. लांब वासा
३६. गुजराथी नृत्यप्रकार
३७. विष
३८. मातीचा कण
३९. एक खमंग वडी
४१. पौर्णिमा
४२. नाहक विषयांतर करणे
४४. विचित्र
४५. चटणी करण्याचे बिनविजेचे साधन
४८. हिंदीत काल आणि उद्या
५०. डोक्याभोवती गुंडाळण्याचे वस्त्र
५२. अभिप्राय
५७. जड
५८. सामोपचार
५९. राजा
६१. नशा आणणारे
६४. बरोबर, सारखा
६५. सुताराकडील दातेरी हत्यार
६६. शांत
६७. लोकांचा कल
६८. पुष्परस
७०. विशेष
७२. कुढत न बसणारा
७४. तात्पर्य
७६. नदीकाठ
७७. मोलभाव

### आडवे उत्तरे

१.द्विशतक ४.काललवण ६.पंतप्रधान ९.हालचाल ११.दाखला १२.यवन १४.अकलमंद १६.वरखल १८.पाकळी १९.रग २०.लाज २२.धनवान २५.नाशिक २७.रामायण २८.सहदेव ३०.कपाळमोक्ष ३३.देह ३४.राजस ४०.चारा ४३.वारा ४४.अदपाव ४६.रजक ४७.रिकामटेकडा ४९.टाळाटाळ ५१.रमणी ५३.फोल ५४.गो ५५.बल्लव ५६.सवत ५७.वसाड ६०.रमारम ६२.जमणे ६३.पास ६५.करवंद ६७.जमीन ६८.मलम ६९.टाकणखार ७१.दासबोध ७३.वसा ७५.सवतीमत्सर ७७.दक्ष ७८.तरतरीत ७९.रत ८०.मुका मार

### उभे उत्तरे

१.द्वितीय २.तहान ३.कल ४.काल ५.लवकर ६.पंख ७.तलाव ८.नकारघंटा १०.चाबूक ११.दादला १३.वचन १५.लगत १७.रक्षक १८.पान २१.जनादेश २२.धडक २३.वाचाळ २४.माय २६.शिव २७.राक्षस २८.सहचारिणी २९.राजवाडा ३१.पारद ३२.मोरावळा ३५.सरा ३७.गरळ ३८.रज ३९.बाकरवडी ४१.राका ४२.फाटे फोडणे ४४.अजब ४५.पाटा वरवंटा ४८.कल ५०.टापर ५२.मत ५७.वजनदार ५८.साम ५९.भूपाल ६१.मादक ६४.समकक्ष ६५.करवत ६६.नीरव ६७.जनमत ६८.मध ७०.खास ७२.बोलका ७४.सार ७६.तीर ७७.दर




## थोडक्यात/ संक्षिप्त



### केएल राहुलचे दमदार शतक; ४२ वेळा रणजी विजेत्या मुंबईचा क्वार्टर फायनलमध्येच पराभव

**मुंबई**–२०२५–२६ च्या रणजी ट्रॉफीच्या क्वार्टर फायनलमध्ये कर्नाटक क्रिकेट संघानं ४२ वेळा विजेत्या मुंबईला चार विकेट्सनं हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. केएल राहुल सामन्याचा हिरो ठरला, त्यानं दबावाखाली शानदार शतक झळकावलं आणि संघाला संस्मरणीय विजय मिळवून दिला. केएल राहुलचं २४वं प्रथम श्रेणी तर त्याचं नववं रणजी ट्रॉफी शतक होतं. या पराभवासह यंदाच्या हंगामात मुंबईचं आव्हान संपुष्टात आलंय.

### दोन महिन्यांत दुसऱ्यांदा इतिहास रचला, पहिल्यांदा आयपीएल मध्ये महागडा ठरला

**मुंबई**–रणजी ट्रॉफी स्पर्धेत जम्मू काश्मीरने मध्य प्रदेशचा ५६ धावांनी पराभव करत सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. जम्मू काश्मीरला हा सामना जिंकूण देण्यात आणि सेमी फायनलला पोहोचवण्यात वेगवान गोलंदाज आकीब नबी डारने मोलाची भूमिका बजा–वली होती. कारण या सामन्यात त्याने एकट्याने १२ खेळाडूंना आऊट केले होते. आणि हा तोच खेळाडू जो जम्मू काश्मीरचा आयपीएलमधला सर्वात महागडा खेळाडू होता.त्यामुळे दोन महिन्यात त्याने अशी कामगिरी करून पुन्हा एकदा इतिहास रचला आहे. जम्मु काश्मीरने दुसऱ्या डावात २४८ धावा केल्या होत्या आणि पहिल्या डावातून मिळालेल्या ४२ धावांच्या आघाडीच्या बळावर मध्यप्रदेशसमोर २९० धावांचे लक्ष्य होते.या लक्ष्याचा पाठलाग करताना सारांश जैनने ६४ धावांची सर्वाधिक खेळी केली होती.

### स्कॉटलंडचा इटलीवर ७३ धावांनी विजय, गुणतालिकेत उलथापालथ झाल्याचा इंग्लंडला फटका

**नवी दिल्ली**–स्कॉटलंड संघाने ट्वेंटी–२० वर्ल्ड कप स्पर्धेच्या क गटात इटलीविरुद्धच्या लढतीत ७३ धावांनी विजय मिळवला. स्कॉटलंडच्या जॉर्ज मुन्सीच्या (८४ धावा) उल्लेखनीय फटकेबाजीनंतर गोलंदाजांनी कमाल केली आणि क गटाच्या गुणतालिकेत इंग्लंडला तिसऱ्या क्रमांकावर ढकलले.जॉर्ज मुन्सी व मिचेल जॉन्स यांनी पहिल्या विकेटसाठी १३.५ षटकांत १२६ धावा जोडल्या. मुन्सीने सलग दुसरे अर्धशतक झळकावले आणि तो शतक पूर्ण करेल असे वाटत होते. पण, १४ व्या षटकात ग्रांट स्टीवर्टने त्याची विकेट घेतली. मुन्सीने ५४ चेंडूंत १३ चौकार व २ षटकारांसह ८४ धावा केल्या. या वर्ल्ड कपमधील ही संयुक्तीक सर्वोत्तम खेळी ठरली. भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने अमेरिकेविरुद्ध ८४ धावा केल्या होत्या.

### टीम इंडियाविरुद्ध पराभूत होताच अमेरिकन संघासाठी डोनाल्ड यांचा संदेश; म्हणाले...

**वॉशिंग्टन**–अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड यांनी २०२६ च्या टी–२० विश्वचषकात सहभागी होणाऱ्या त्यांच्या देशाच्या संघाचे अभिनंदन केले आहे. अमेरिकेचा संघ ७ फेब्रुवारी रोजी भारताविरुद्ध खेळला होता, जिथे त्यांना पराभव पत्करावा लागला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या संघाबद्दल एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. डोनाल्ड ट्रम्प काय म्हणाले : २०२६ च्या टी–२० विश्वचषकात खेळण्यासाठी अमेरिकेचा संघ भारतात आला आहे. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संघाबद्दल एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे, ते म्हणाले, मी नुकतंच ऐकले की क्रिकेट विश्वचषक भार–तात होत आहे! मी संघ यूएसएला शुभेच्छा देतो! आमचा संघ खूप मजबूत आहे. मी आणि अमेरिका सदैव तुमच्यासोबत आहे.

# दक्षिण आफ्रिकेचा कॅनडावर विजय!

## नवनीत धालीवालचे अर्धशतक व्यर्थ ✦ आफ्रिकी गोलंदाजांसमोर कॅनडाची झुंज अपयशी

**दक्षिण आफ्रिका विरुद्ध कॅनडा या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ५७ धावांनी विजय मिळवला आहे.**

**नवी दिल्ली:** टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत नवखे संघ अनुभवी संघांविरूद्ध खेळताना दमदार कामगिरी करताना दिसून येत आहेत. स्पर्धेतील ९ वा सामना बलाढ्य दक्षिण आफ्रिका आणि कॅनडा या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात कॅनडाने दक्षिण आफ्रिकेला कडवी झुंज दिली. पहिल्या डावात फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेने २१३ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना कॅनडाला सुरूवातीला मोठे धक्के बसले. पण शेवटी नवनीत धलीवा–लने अर्धशतकी खेळी करून संघाला आव्हानाच्या जवळ घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. पण कॅनडाला हा सामना ५७ धावांनी गमवावा लागला आहे. हा सामना नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडला. या मैदानावर धावांचा यशस्वी पाठलाग केला जाऊ शकतो. त्यामुळे कॅनडाच्या कर्णधाराने नाणेफ

**४ गडी बाद २१३ धावा**

**डेव्हिड मिलरने २३ चेंडूत ३९ धावा केल्या. तर ट्रिस्टन स्टब्सने १९ चेंडूत ३४ धावा केल्या. या खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने २० षटकांअखेर ४ गडी बाद २१३ धावा केल्या.**

अवघ्या ४ आणि श्रेयस मोवा अवघ्या ९ धावा करत माघारी परतला. शेवटी हर्ष ठकेरने ३३ आणि साद जफरने ११ धावांचे योगदान दिले. कॅनडाकडून नवनीत धालीवालने ६४ धावांची दमदार खेळी केली. पण तो कॅनडाला पहिला विजय मिळवून देऊ शकलेला नाही.या सामन्यात कॅनडाने नाणेफक जिंकून दक्षिण आफ्रिकेला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेने २० षटकांअखेर ४ गडी बाद २१३ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या कर्णधार एडेन मारक्रम आणि क्विंटन डी कॉक यांनी दमदार सुरूवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ७० धावा जोडल्या. एडेन मारक्रमने ५९ धावांची खेळी केली. तर क्विंटन डी कॉकने २५ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या रायन



रिकल्टनने ३३ धावा केल्या. शेवटी डेव्हिड मिलर आणि ट्रिस्टन स्टब्सने तुफान फटकेबाजी केली. डेव्हिड मिलरने २३ चेंडूत ३९ धावा केल्या. तर ट्रिस्टन स्टब्सने १९ चेंडूत ३४ धावा केल्या. या खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने २० षटकांअखेर ४ गडी बाद २१३ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेची विजयी सलामी–हा दोन्ही संघांचा या स्पर्धेतील पहिलाच सामना होता. दक्षिण आफ्रिकेने २०२४ मध्ये झालेल्या टी–२० वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला होता. त्यामुळे यावेळीही दक्षिण आफ्रिकेला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. दक्षिण आफ्रिकेने पहिल्याच सामन्यात विजयी सलामी दिली आहे.दक्षिण आफ्रिकेचे पुढील सामने न्यूझीलंड, अफगाणिस्तान आणि यूएई या संघांविरूद्ध होणार आहेत.

## टी–२० वर्ल्डकप सुरू असताना इउउख ची मोठी घोषणा! विराट– रोहित अनब इशानचं टेन्शन वाढलं

**नवी मुंबई**:बीसीसीआयकडून सेंट्रल कॉन्ट्रॅक्टची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत भारताचे स्टार खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना मोठा धक्का बसला आहे. गेल्या काही वर्षांपासून ग्रेड ए प्लस श्रेणीत असणाऱ्या विराट कोहली आणि रोहित शर्माचं डिमोशन झालं आहे. बीसीसीआयकडून या दोन्ही दिग्गजांचा ग्रेड बी कॅटेगरीत समावेश करण्यात आला आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोन्ही दिग्गजांनी टी–२० आंतरराष्ट्रीय आणि कसोटी क्रिकटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. दोघे केवळ वनडे क्रिकेट खेळत आ–हेत. त्यामुळे बीसीसीआयने हा निर्णय घेतला आहे.

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना ग्रेड ए प्लस कॅटेगरीतून बाहेर करण्यासह बीसीसीआयने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयने ग्रेड ए प्लस कॅटेगरी काढून टाकली आहे.आतापर्यंत सेंट्रल कॉन्ट्रॅक्टची सुरूवात ग्रेड ए प्लस




कॅटेगरीपासून होत होती. पण बीसीसीआयने ही कॅटेगरी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.ग्रेड ए प्लस कॅटेगरीत त्याच खेळाडूंचा समावेश केला जायचा, जे खेळाडू तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करतात. पण सध्या असा एकही खेळा–डू नाही, जो तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करत आहे. त्यामुळे ही कॅटेगरीच रद्द करण्यात आली आहे. तर ग्रेड ए कॅटेगरीत वनडे आणि कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा यांचा समावेश करण्यात आला आहे. तर आतापर्यंत ग्रेड ए प्लस कॅटेगरीत असणाऱ्या विराट कोहली आणि रोहित शर्माचा ग्रेड बी कॅटेगरीत समावेश करण्यात आला आहे.या कॅटेगरीत विराट आणि रोहितसह आणखी ११ खेळाडूंना स्थान देण्यात आलं आहे. ज्यात केएल राहुल, वॉशिंग्टन सुंदर, हार्दिक पांड्या, ऋषभ पंत आणि यशस्वी जैस्वाल यांचा सम ावेश करण्यात आला आहे. तर ग्रेड सी कॅटेगरीत युवा फलंदाज तिलक वर्मा आणि अभिषेक शर्मासारख्या खेळाडूंना स्थान देण्यात आलं आहे. बीसीसीआयच्या सेंट्रल कॉन्ट्रॅक्टनूसार ग्रेड ए प्लस कॅटेगरीत असणाऱ्या खेळाडूंना ७ कोटी, ग्रेड ए मध्ये असणाऱ्या खेळाडूंना ५ कोटी, ग्रेड बी मध्ये असणाऱ्या खेळाडूंना ३ कोटी आणि ग्रेड सी मध्ये असणाऱ्या खेळाडूंना १ कोटी रूपये दिले जात होते. पण आता ग्रेड ए प्लस कॅटेगरी हद्दपार करण्यात आली आहे. तरीदेखील खेळाडूंचं मानधन कमी केलं जाणार नाही. कुठलाही खेळाडू ग्रेड ए प्लस कॅटेगरीत नसल्यामुळे एकाही खेळाडूला ७ कोटी रूपये दिले जाणार नाहीत.

## झिम्बाब्वे अव्वल स्थानी

**नवी दिल्ली**–झिम्बाब्वेने ट्वेंटी–२० वर्ल्ड कप स्पर्धेत ओमानवर विजय मिळवून ब गटात अव्वल स्थानी झेप घेतली. त्यांनी श्रीलंकेला ( १.०००) नेट रन रेटमध्ये ( २.७०२) मागे टाकले आणि नंबर वन बनले. ओमानचे १०३ धावांचे लक्ष्य झिम्बाब्वेने १३.३ षटकांत २ बाद १०६ धावा करून पार केले. या सामन्यात ब्रायन बेनेट याचा झेल हा चर्चेचा विषय ठरला. अनेकांनी याला यंदाच्या वर्ल्ड कपमधील आतापर्यंतचा सर्वोत्तम झेल म्हणून घोषित केले. ब गटातील सामन्यात झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून ओमानविरुद्ध प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. ब्लेसिंग मुझाराबानीने दुसऱ्याच षटकात ओम ानचा कर्णधार जतिंदर सिंगचा ५ धावांवर त्रिफळा उडवला. त्यानंतर रिचर्ड एनगाराव्हाने तिसऱ्या षटकात हम्मद मिर्झाला शून्यावर बाद करून ओमानला दुसरा धक्का दिला. ओमानचे विकेट पडण्याचे सत्र चौथ्या षटकात कायम राहिले. ब्लेसिंगने त्या षटकात आमीर कलीम ( ५) आणि करण सोनावळे ( ०) यांना बाद करून ओमानची अवस्था ४ बाद १७ अशी केली. सिकंदर रझाला गोलंदाजीला आणल्याचा झिम्बाब्वेला फायदा झाला आणि त्याने वसीम अलीचा ( ३) त्रिफळा उडवला. निम्मा संघ २७ धावांत माघारी परतल्यानंतर ओमानचे पुनरागमन अवघड झाले होते. सुफियान मेहमूद व विनायक शुक्ला यांनी ओमानचा डाव सावरला. रिचर्डने पुन्हा कल्ला केला आणि ही जोडी तोडली. विनायक २८ धावांवर बाद झाला आणि पाठोपाठा जितेने रामानंदी ( १) पण माघारी परतला. ब्रॅड इव्ह–न्सने मेहमूदला ( २५) बाद करून ओमानच्या पुनरागमनाच्या आशा मावळून टाकल्या. नदीम खानच्या ( २०) खेळीने ओम ान शतकपार पोहोचला. पण, त्यांचा संपूर्ण संघ १९.५ षटकांत १०३ धावांत तंबूत परतला. झिम्बाब्वेच्या रिचर्ड, ब्लेसिंग व ब्रॅड यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या.

अर्धशतकीय भागीदारीने झिम्बाब्वेला विजयाच्या उंबरठ्यावर सिकंदर रझाचा हा ट्वेंटी–२० वर्ल्ड कप स्पर्धेतील १५ वा सामना आहे आणि झिम्बाब्वेकडून एवढे सामने खेळ–णारा तो पहिला खेळाडू ठरला. त्याने सीन विलियम्सनचा विक्रम मोडला. ब्रेंडन टेलरने ट्वेंटी–२० वर्ल्ड कपमध्ये ८ बळी टिपले आणि त्याने चकाब्वाचा ( ५) विक्रम मोडला. झिम्बाब्वेकडून मुझारबानीहा ( १५) ट्वेंटी–२० वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक बळी टिपणारा गोलंदाज ठरला. त्याने सिकंदरला ( १४) मागे टाकले. लक्ष्याचा पाठलाग करताना तदिवानाशे मारुमानी ( २१) व डिओन मेयर्स ( ०) हे स्वस्तात बाद झाले. त्यानंतर ब्रायन व ब्रेंडन टेलर यांनी मोर्चा सांभाळला. दोघांच्या अर्धशतकीय भागीदारीने झिम्बाब्वेला विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचवले. टेलर ३१ धावांवर रिटायर्ड हर्ट ठरला. ब्रयानने ३६ चेंडूंत ७ चौकारांसह नाबाद ४८ धावा केल्या. सिकंदर ५ धावांवर नाबाद राहिला.

**ब्रायन बेनेटने घेतला भन्नाट झेल**–या सामन्यात ब्रायन बेनेट तुफान चर्चेत राहिला. या सामन्यातील पहिल्या डावात झिम्बाब्वेची गोलंदाजी सुरू असताना ब्रायन बेनेटने डावातील शेवटच्या चेंडूवर सीमारेषेवर डाईव्ह मारून भन्नाट झेल घेतला. हा या स्पर्धेतील सर्वोत्तम कॅचपैकी एक आहे. पहिल्या डावात क्षेत्ररक्षणामुळे चर्चेत राहिलेल्या बेनेटने दुसऱ्या डावात धावांचा पाठलाग करताना नाबाद ४८ धावांची खेळी केली.

## क्षेत्ररक्षण करताना इटलीच्या कर्णधाराचा हात निखळला

मुंबई–टी–२० वर्ल्ड कप स्पर्धेला शनिवारी ७ फेब्रुवारीपासून सुरूवात झाली आहे. अनेक मोठ्या संघांची लहान संघांची तारांबळ उडवल्याचे दिसून आले. यंदाच्या वर्ल्ड कपमध्ये सुरूवातीलाच नवख्या संघांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. वर्ल्ड कप सुरू असताना काही खेळाडूंना दुखापतीने ग्रासले आहे. त्यामुळे काहींना संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडावे लागले आहे. चालू सामन्यात क्षेत्ररक्षण करताना चेंडू अडविण्यासाठी झेप घेतल्यामुळे कर्णधाराचा खांदा निखळल्याने त्याला स्पर्धेबाहेर जावे लागले आहे. इटली आणि स्कॉटलँडमध्ये सामना पार पडला. या सामन्यात इटलीचा ७३ धावांनी पराभव झाला. या सामन्यामध्ये इटलीचा कर्णधार मॅडसेन याने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. स्कॉटलँड संघाने प्रथम फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २०७–४ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना इटलीचा संघ १६.४ ओव्हरमध्ये १३४ धावा करू शकला. या साम न्यादरम्यान एक वाईट घटना घडली. कर्णधार वेन मॅडसेन याला क्षेत्ररक्षण करत असताना गंभीर दुखापत झाली. चेंडू अडवण्याच्या प्रयत्नात त्याने उडी मारली. यादरम्यान तो जोरात खांद्यावर पडला. सुरूवातीला सर्वांना वाटले नव्हते की ही गंभीर दुखा–पत असेल. पण जेव्हा तो वेदनेने मैदानावर पडून राहिला. मॅडसेनला पाहण्यासाठी मैदानामध्ये फिजिओथेरपिस्टला आले आणि त्याची विच–ारपूस केल्यावर त्याला बाहेर घेऊन गेले. त्याचा खांदा निखळल्याची माहिती समोर आली आहे. पॉवर प्लेच्या चौथ्या षटकामध्ये हे घडले. इटली आणि स्कॉटलंडमधील सामना कोलकाता येथील ईडन गार्डनवर पार पडला. इटली संघ पहिल्यांदाच वर्ल्ड कपमध्ये सहभागी झाला होता. मात्र पहिल्याच सामन्यात कॅप्टनला दुखापतीमुळे बाहेर जावे लागले आहे.

### हर्षित राणाच्या गुडघ्यावर यशस्वी शस्त्रक्रिया!


मुंबई –ट्वेंटी–२० वर्ल्ड कप स्पर्धेतून माघार घेणाऱ्या भारतीय वेगवान गोलंदाज हर्षित राणाच्या गुडघ्यावर यशस्वी शस्त्रक्रिया झाली आहे. दुखापतीमुळे तो ट्वेंटी–२० वर्ल्ड कप २०२६ मधून बाहेर पडला होता आणि त्याच्या जागी मोहम्मद सिराजची भारतीय संघात निवड केली गेली आहे.भारताच्या विश्वचषक मोहिमेला सुरुवात होण्याच्या काही दिवस आधी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सराव सामन्यादरम्यान राणाला दुखापत झाली. त्यानंतर त्याने मैदान सोडले आणि त्यानंतर झालेल्या वैद्यकीय तपासणीत तो वर्ल्ड कप स्पर्धा खेळू शकणार नाही, असे दिसून आले. त्यामुळे निवड समितीने त्याला संघातून वगळण्याचा निर्णय घेतला. हर्षित राणाची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे आणि आता संपूर्ण लक्ष पुनर्वसन आणि पुनर्प्राप्तीकडे आहे.

# भारत–पाकिस्तान टी–२० सामना होणार, आणि पाकिस्तानचा अखेर यू–टर्न

**नवी दिल्ली**:क्रिकेट इतिहासातील सर्वात मोठे प्रतिस्पर्धी संघ असलेल्या भारत आणि पाकिस्तान सामन्याबाबत मोठी अपडेट समोर येत आहे. टी–२० विश्वचषक २०२६ मधील भारताविरूद्धच्या सामन्यावर पाकिस्तानने बहिष्कार टाकला होता. पण आता ८ दिवसांतच पाकिस्तानचं डोकं आयसीसीने ठिकाण्यावर आलं असून पाकिस्तान सरकारने माघार घेतली आहे. यासह आता भारत–पाकिस्तान संघांम धील हायव्होल्टेज लढत येत्या रविवारी पाहायला मिळणार आहे.

पाकिस्तान सरकारने पाकिस्तान क्रिकेट संघाला भारताविरुद्ध सामना खेळण्याच्या सूचना दिल्या केल्या आहेत. सरकारने सोशल मीडिया पोस्टद्वारे याची घोषणा केली. यासह आता रविवार १५ फ ेब्रुवारी रोजी टी–२० वर्ल्डकपमधील भारत–पाकिस्तान सामना होणार आहे.

पाकिस्तान व बांगलादेश क्रिकेट बोर्ड तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (खउउ) यांच्यात सलग चर्चा सुरू होत्या. खउउ चे प्रमुख जय शाह यांच्या





सल्लामसलतीनंतर झालेल्या या बैठकीत बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (इउइ) पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला (झउइ) भारताविरुद्ध सामना खेळण्याचे आवाहन केले. त्यानंतर पाकिस्तान सरकारने आपली भूमिका बदलली.

पाकिस्तानने सरकारने भारत–पाक सामन्याबद्दल काय पोस्ट केली?

पाकिस्तान सरकारने निवेदनात म्हटलं आहे की, ङ्गबहुपक्षीय चर्चांमधून सकारात्मक निष्कर्ष मिळाल्याने तसेच मैत्रीपूर्ण राष्ट्रांच्या विनंतीचा विचार करून, पाकिस्तान राष्ट्रीय क्रिकेट संघाला १५ फेब्रुवारी २०२६ रोजी आयसीसी पुरुष टी–२० विश्वचषकातील नियोजित सामन्यासाठी मैदानात उतरण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.ङ्घ

या संपूर्ण नाट्यावर पडदा पडल्याचे स्पष्ट करत खउउ नेही प्रतिक्रिया दिली. ङ्गखउउ आणि झउइ यांच्यातील संवाद व्यापक चर्चेचा भाग होता. दोन्ही पक्षांनी खेळाच्या सर्वोत्तम हितासाठी प्रामाणिकपणा, तटस्थता आणि सहकार्य राखत एकत्रित व सकारात्म क भूमिका घेतली,ङ्घ असे खउउ कडून सांगण्यात आले.

बीसीबीचे अध्यक्ष अमिनुल इस्लाम यांनी यापूर्वी दिलेल्या निवेदनात, गेल्या आठवड्याच्या शेवटी पडद्यामागे झालेल्या चर्चांचा संकेत दिला होता. ङ्गकाल (रविवार) पाकिस्तानला दिलेल्या भेटीनंतर आणि चर्चेतून सकारात्मक निष्कर्ष अपेक्षित असल्याने, संपूर्ण क्रिकेट विश्वाच्या हितासाठी पाकिस्तानने भारताविरुद्ध सामना खेळावा, अशी मी विनंती करतो,ङ्घ असे माजी बांगलादेश कर्णधार अमिनुल इस्लाम यांनी म्हटलं होतं. दरम्यान, ङ्गफोर्स मॅज्युअरफ कलम लागू करण्याची पाकिस्तानची मागणी आयसीसीने फेटाळल्यानंतर, भारताविरुद्ध सामना बहिष्कृत करण्याच्या भूमिकेवरून पाकिस्तान माघार घेण्याचे संकेत दिसू लागले. आयसीसीचं म्हणणं होतं की, परिस्थिती त्यांच्या नियंत्रणाबाहेर असल्याचा पाकिस्तानचा युक्तिवाद कमकुवत आहे. तसेच, जर पीसीबी आपल्या निर्णयावर ठाम राहिली, तर त्यांना मोठा दंड आणि कठोर निर्बंधांना सामोरे जावे लागेल, ज्यामुळे पाकिस्तान क्रिकेट विश्वात एकाकी पडेल, असा इशाराही देण्यात आला. मात्र याआधी सोमवारी मोहसिन नक्वी यांनी या धमक्यांची पर्वा नसल्याचं म्हटलं होतं, ङ्गआम्ही अशा धमक्यांना घाबरणाऱ्यांपैकी नाही. आमचे फील्ड मार्शल (आसिम मुनीर) कोण आहेत, हे सगळ्यांना माहित आहे.

# लातूरमध्ये हात सुसाट! जिल्हा परिषदेत कॉंग्रेसची ऐतिहासिक मुसंडी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक २०२६ चे निकाल स्पष्ट झाले असून, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने जिल्ह्यावर आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. ''विकासाची परंपरा आणि विलासरावजींचा विचार'' यावर लातूरच्या मतदारांनी शिक्कामोर्तब केले असून, कॉंग्रेसने जिल्ह्यात विजयाचा मोठा गुलाल उधळला आहे. कॉंग्रेस पक्षाने जिल्हाभरात जोरदार मुसंडी मारत बहुमताचा जवळ जाणारा आकडा पार केला आहे.

**बाभळगावात जल्लोष आणि लोकनेत्यांना अभिवादन**

निवडणूक निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांनी आणि कार्यकर्त्यांनी बाभळगावच्या दिशेने धाव घेतली.





विजयाचा गुलाल आणि ढोल-ताशांच्या गजरात नवनियुक्त सदस्यांनी बाभळगाव निवासस्थानी भेट दिली. जिल्हा परीषद व पंचायत समिती महाराणा प्रतापनगर, पांखरसांगवी, काटगाव, हरंगुळ बु, साकोळ, तांदुळजा आदीसह विजयी उमेदवारांनी बाभळगाव येथे भेट दिली

**देशमुख कुटुंबीयांकडून स्वागत:** माजी मंत्री, आमदार मा. श्री. अमित विलासराव देशमुख, माजी आमदार मा. श्री. धिरज विलासराव देशमुख आणि विलास साखर कारखान्याच्या चेअरमन मा. वैशाली विलासराव देशमुख यांनी सर्व नवनियुक्त सदस्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्मृतीस्थळाचे दर्शन: सर्व विजयी उमेदवारांनी प्रथम लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मृतीस्थळी जाऊन नतमस्तक होऊन अभिवादन केले. ''साहेबांच्या विचारांचा वारसा आणि सर्वसामान्यांच्या विकासाची ही परंपरा अधिक जोमाने पुढे नेऊ,'' असा संकल्प यावेळी नवनियुक्त सदस्यांनी व्यक्त केला. या विजयाने जिल्ह्याचा राजकीय नकाशा कॉंग्रेसमय झाला आहे.

## राजमाता जिजामाता संकुलातर्फे प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या संचालकपदी प्राचार्या शुभांगी विक्रम काळे यांची निवड झाल्याबद्दल राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सोमवारी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते आमदार विक्रम काळे आणि प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार करण्यात आला.

शिवछत्रपती शिक्षण संस्था आणि राजर्षी शाहू कॉलेजचे नाव शिक्षणातील आगळ्या वेगळ्या पॅटर्नमुळे देशभरात गाजत आहे. मी राजर्षी शाहू महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. आज या संस्थेची संचालक म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली आहे, ही माझ्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे, असे सांगून संस्था आणि कॉलेजच्या प्रगतीसाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही प्राचार्या शुभांगी काळे यांनी दिली.

प्राचार्या शुभांगी काळे यांना शिक्षण क्षेत्रातील कामाचा चांगला अनुभव आहे. या अनुभवाच्या जोरावर त्या शिक्षण क्षेत्रात उत्तम कामगिरी करतील, असे आमदार विक्रम काळे म्हणाले. तर प्राचार्या शुभांगी काळे यांच्या या निवडीमुळे मुलींचे प्रश्न मार्गी लागतील व 'शाहू पॅटर्न'ला चांगली दिशा मिळेल, असा विश्वास प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी व्यक्त केला.

यावेळी शांताबाई वसंतराव काळे, कवि योगीराज माने, विपुल काळे, राजमाता जिजामाता विद्यालयाचे समन्वयक राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.

## स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्यावतीने डॉ.अभय बंग यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेच्या वतीने बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी 'आरोग्य-स्वराज्य' या विषयावर डॉ. अभय बंग यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या मनातील महाराष्ट्राच्या नकाशात गडचिरोली ची दखलसुद्धा असत नाही. अधिकाऱ्यांना ती काळ्यापाण्यापेक्षा भयाण शिक्षा वाटते. अशा आदिवासी, दरिद्री आणि दुर्गम भागात, गेल्या ४१ वर्षांपासून डॉ.अभय व डॉ. राणी बंग हे दांपत्य वैद्यकीय सेवा देत आहेत. आदिवासी भागात बालपणातील कुपोषणामुळे त्यांच्या आरोग्याची दैना उडते. बालकांची वाढच व्यवस्थित होत नाही, बालपणातच असंख्य रोग जडतात. हे सिध्द करून बंग दांपत्यांनी कुपोषणाच्या जीर्ण समस्येला राष्ट्रीय पातळीवर आणले. त्या भागातील सर्वसामान्यांनाच आरोग्यदूत३९;करून बालमृत्यू रोखण्यासाठी कृतीआराखडा अंमलात आणला. त्यांच्या शोधनिबंधांचा जगभर सन्मान झाला. त्यांनी सुचवलेल्या उपाययोजनांना जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ यांनी स्वीकारले आहे.

डॉ.अभय व डॉ. राणी बंग यांचे शोधग्राम हे , संपूर्ण देशातील सामाजिक कार्यकर्त्यांसाठी स्फूर्तीस्थान झाले आहे. मी मी आणि केवळ मीमध्ये रममाण होत चाललेल्या तरूणांनी सामाजिक कार्याची जबाबदारी का व कशी घ्यावी? याचे प्रशिक्षण देण्याकरिता डॉ. बंग यांनी निर्माण उपक्रम चालू केला आहे. त्यातून शेकडो कार्यकर्ते तयार झाले असून ते देशभर कार्यरत आहेत.

एकाच वेळी संशोधन आणि वैद्यकीय सेवा देत असलेले डॉ. बंग हे आरोग्य विचार सर्वदूर पोहोचवण्यासाठी लेखनही करत आहेत. त्यांनी



'माझा साक्षात्कारी हृदयरोग' मधून हृदयविकाराचा झटका आणि तो रोखण्यासाठी जीवनशैली कशी असावी? हे सांगितले. 'सेवाग्राम ते शोधग्राम' या

पुस्तकातून त्यांचा वैयक्तिक प्रवास आणि त्यांचे कार्य उलगडून दाखवले. तरुणांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे 'या जीवनाचे काय करू?' या पुस्तकातून सुचवली. त्यांचे 'आरोग्य-स्वराज्य' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी 'आपण आजार होण्याआधी आरोग्य कसे जपावे? आजार झालाच तर जवळ, स्वस्त उपचार देण्यासाठी आरोग्य धोरण कसे असावे?' यांवरील सखोल चिंतन मांडले आहे. ही संकल्पना स्पष्ट करून संवाद साधण्यासाठी, ते लातुरात येत आहेत.

११ फेब्रुवारी २०२६ (बुधवार ) रोजी सायंकाळी ५.३० वाजता , श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या 'कस्तुर-कंचन' सभागृहात डॉ. अभय बंग हे 'आरोग्य-स्वराज्य' यावर विचार मांडणार आहेत.

लातूरकरांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्यावतीने श्रीनिवास लाहोटी, सुमती जगताप,डॉ.अजित जगताप आणि अतुल देऊळगावकर यांनी केले आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात बुधवारी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत कायदेविषयक मार्गदर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी, माजी सैनिक विधवा व त्यांचे अवलंबित यांच्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत बुधवार, ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर हे यावेळी महसूल विषयक, कौटुंबिक वादविवाद संदर्भातील अडीअडचणी जाणून घेण्यासाठी, त्यावर योग्य ते कायदेविषयक मार्गदर्शन व आवश्यक ती मदत करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबित यांनी लातूर जिल्हा सैनिक कार्यालय येथे आवश्यक त्या कागदपत्रासोबत उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## पुण्यात महापौर, उपमहापौर पदासाठी बिनविरोध निवडणूक

**पुणे/प्रतिनिधी :** भाजपच्या मंजुषा नागपुरे यांची पुण्याच्या महापौर पदी, तर भाजप-रिपब्लिकन पक्षाचे परशुराम वाडेकर यांची उपमहापौर पदी आज म्हणजेच सोमवार ९ फेब्रुवारी रोजी बिनविरोध निवड झाली आहे.कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर ही निवडणूक बिनविरोध झाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार पुणे महापालिकेत सकाळी सव्वा अकरा वाजता महापौर आणि उपमहापौर निवडीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. यावेळी भाजपचे गटनेते गणेश बिडकर यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे ही निवडणूक बिनविरोध करण्याची विनंती कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेते यांना केली.दरम्यान, साडे अकरा वाजण्याच्या सुमारास उमपहौर पदाच्या निवडीसाठीची प्रक्रिया सुरू झाली. कॉंग्रेसकडून साहिल केदारी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून दत्ता बहिरट, तर भाजपकडून परशुराम वाडेकर यांचे अर्ज वैध ठरले. त्यानंतर बहिरट व केदारी यांनी उपमहापौर पदाच्या निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे उपमहापौर पदी भाजप रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर वाडेकर यांची उपमहापौर म्हणून निवड करण्यात आली.

## दयानंद कला महाविद्यालयात सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** ४/२/२०२६ रोजी दयानंद कला महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ करिता सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या माध्यमातून महाविद्यालयात विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अनमोल मार्गदर्शनानुसार सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ.रामेश्वर खंदारे यांनी मुलाखतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे कलागुण व कौशल्य पाहून या अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची शै. वर्ष २०२५ - २६ करिता निवड केली. याप्रसंगी प्रा.स्फूर्ती समुद्रे प्रा. चैतन्य शिंदे यांचेही अनमोल सहकार्य लाभले. या अभ्यास मंडळाचे नुतन अध्यक्ष म्हणून वसंत कुलकर्णी, उपाध्यक्ष कामाक्षा मुदाळे, सचिव त्रिमुख इगवे, कोषाध्यक्ष विमल पाल, सोशल मिडीया संयोजक देवांश पाचंगे ,प्रसिद्धी प्रमुख विशाल भांगुरे, कलामंच प्रमुख निलेश वाघमारे, तसेच सदस्य म्हणून सोनिया कांबळे ,स्वाती जाधव ,अमृता काळे, अश्विनी चव्हाण, शुभम जानापुरे ,अभिषेक ठाकूर यांची निवड करण्यात आली.

## जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे आण्विक जीवशास्त्र, जनुकशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक प्रगती

### दयानंद विज्ञान महाविद्यालयात जॅक मॉनो यांच्या जयंतीनिमित्त विशेष सेमिनार

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात आज दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सुप्रसिद्ध फ्रेंच आण्विक जीवशास्त्रज्ञ व जैवरसायनशास्त्रज्ञ जॅक मॉनोड यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाला अंतर्गत विशेष सेमिनाराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते जॅक मॉनो यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थि श्रीशैल्यम रावणगावे याने जॅक मॉनो यांच्या जीवनकार्यावर आधारित सविस्तर सादरीकरण केले.

सादरीकरणात जॅक मॉनो यांनी फ्रॉंस्वा जेकब यांच्यासह विकसित केलेल्या ऑपेरॉन संकल्पनेद्वारे जनुक अभिव्यक्तीचे नियमन कसे होते, हे प्रथमच स्पष्ट केल्याचे नमूद करण्यात आले. विशेषतः डीएनएआरएनएप्रथिन यांच्या परस्परसंबंधांवर आधारित जनुक नियमन या संकल्पनेने आण्विक जीवशास्त्राला नवी दिशा दिली.

जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे जिवाणूंमध्ये एंझाइम निर्मिती, जैवरासायनिक अनुकूलन आणि कोशिकीय नियंत्रण प्रणाली यांचा शास्त्रीय आधार स्पष्ट झाला. त्यांच्या या मूलभूत संशोधनासाठी १९६५ साली त्यांना फ्रॉंस्वा जेकब आणि अँद्रे ल्वॉफ यांच्यासह नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जॅक मॉनो यांच्या संशोधनामुळे आण्विक जीवशास्त्र, जनुकशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय संशोधनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक प्रगती




झाली. त्यांच्या लिखाणातून वैज्ञानिक विचारसरणी, तर्कशुद्धता, शिस्त आणि संशोधनातील नैतिकता यांचे महत्त्व अधोरेखित होते.

या सेमिनारमुळे विद्यार्थ्यांमध्ये आण्विक जीवशास्त्र, जनुक नियमन, संशोधनवृत्ती व वैज्ञानिक विचारशक्ती विकसित होण्यास निश्चितच चालना मिळाली.

याप्रसंगी प्रा. डॉ. फिरदौस बिरादार, प्रा. ऋतुजा डिग्रसकर आणि प्रा. श्वेता मदने तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व पदवीपदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या मुलींनी IEDSSA G-2 झोन कॅरम स्पर्धेत पटकावला द्वितीय क्रमांक

**लातूर/प्रतिनिधी :** IEDSSA महाराष्ट्र राज्यांतर्गत G-2 विभागीय कॅरम मुली स्पर्धेत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. ग्रामीण टेक्निकल अँड म्यॅनेजमेंट कॅम्पस, नांदेड येथे दि. ०७ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या या स्पर्धेत डी.फार्मसी प्रथम व द्वितीय वर्षांच्या विद्यार्थिनी कु. भक्ती कुमठे, कु. समीक्षा कलशेट्टी, कु. ज्योती जगताप, कु. गायत्री शिंदे व कु. आशा नंदगावे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाचे श्रेय क्रीडा शिक्षक श्री. ऋषी मस्के यांच्या मार्गदर्शनाला आहे.या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष मा. ललितभाई शहा, रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे, मा. अजिंक्यजी सोनवणे,




कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच इतर मान्यवर पदाधिकाऱ्यांनी विजयी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्गानेही त्यांचा गौरव करून अभिनंदन व्यक्त केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# कठीण काळ आणि आव्हानेच उत्तम नेतृत्व घडवतात

## ‘बॅबसन कॉलेज’च्या माजी विद्यार्थ्यांचा मुलांना मोलाचा सल्ला




**लातूर/प्रतिनिधी:** ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प येथे नुकतेच एका विशेष आणि मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. अमेरिकेतील प्रसिद्ध बॅब्सन कॉलेज’चे (Babson College) विद्यार्थी हृदय मुनोथ,नेहा असवानी आणि सिद्धांत नरहरे (MSEL 2025) यांनी प्रकल्पास भेट देऊन विद्यार्थ्यांना करिअर, उद्योजकता आणि मानसिक स्वास्थ्य या विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले.

गेल्या ३० वर्षांपासून उद्योजकता (Entrepreneurship) शिक्षणामध्ये जगात प्रथम क्रमांकावर आणि अमेरिकेत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रतिष्ठित ‘बॅब्सन कॉलेज’च्या या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव ज्ञानप्रकाशच्या विद्यार्थ्यांसमोर मांडले. इयत्ता ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी हे सत्र आयोजित करण्यात आले होते.

या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर विचार करण्यास प्रवृत्त करणे हा होता. हृदय आणि नेहा यांनी आपले जागतिक स्तरावरील अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले जग खूप मोठे आहे आणि येथे प्रगतीच्या अनंत संधी उपलब्ध आहेत.भारतीय शिक्षण पद्धती आणि अमेरिकेतील शिक्षण पद्धती यामध्ये जाणवलेला फरकही स्पष्ट केला. तसेच, विद्यार्थ्यांनी आता केवळ पारंपरिक करिअर पर्यायांचा विचार न करता, ’ग्लोबल माइंडसेट’ (जागतिक दृष्टिकोन) ठेवणे किती गरजेचे आहे, हे सोदाहरण पटवून दिले.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, येणाऱ्या काळात केवळ पदव्या घेणारे विद्यार्थी यशस्वी होणार नाहीत, तर जे विद्यार्थी समाजातील समस्या सोडवू शकतील (Problem Solvers), तेच खऱ्या अर्थाने प्रगती करतील. समस्या सोडवण्याची ही वृत्तीच तुम्हाला भविष्यात आर्थिक स्थैर्य आणि सर्वांगीण विकास (Holistic Financial Growth) मिळवून देणार आहे. यासाठी तुमच्यातील सृजनशीलता (Creativity) जपणे आणि तिचा वापर समस्यांवर उपाय शोधण्यासाठी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

उद्योजकतेची नवी व्याख्या मांडताना त्यांनी स्पष्ट केले की, उद्योजकता (Entrepreneurship) म्हणजे केवळ एखादा व्यवसाय सुरू करणे किंवा ’जॉब’ करणे नव्हे. तर ती एक विचारसरणी (Mindset) आहे. समाजातील लोकांचे दुःख, वेदना (Pain points) आणि गरजा आणि अडचणी समजून घेऊन, त्यावर शाश्वत उपाय शोधणे म्हणजेच खरी उद्योजकता होय.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी, कठीण काळ आणि आव्हानेच उत्तम नेतृत्व आणि व्यक्तिमत्व घडवतात, हा विचार मांडला, ज्यामुळे मुलांचा आत्मविश्वास दुणावला. केवळ सामूहिक सत्रच नाही, तर त्यानंतर झालेल्या ’वन-ऑन-वन’ (वैयक्तिक) सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न, शंका आणि वैयक्तिक समस्या पाहुण्यांसोबत मोकळेपणाने मांडल्या. शाळेच्या स्तरावर अशा प्रकारचे प्रयोगशील (Experimental) आणि थेट संवादाचे सत्र आयोजित करण्यात ज्ञानप्रकाशने पुढाकार घेतला याबद्दल प्रकल्पाची भूमिका अतिशय उत्कृष्ट आहे असेही ते म्हणाले.

या उपक्रमामुळे ज्ञानप्रकाश शाळेतील विद्यार्थ्यांना करिअर विकासाची आणि व्यक्तिमत्व जडणघडणीची एक नवी दिशा मिळेल .परदेशातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अनुभव ऐकून मुलांच्या मनावर या सत्राचा चिरकाल टिकणारा सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून आला.

## झिंगणप्पा स्वामींच्या शिवपिंडीवर महीलांचा शिवरात्रीस सामोहीक दुग्धाभिषेकाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी:** लातुर येथील गावभागातील संतशिवयोगी झिंगणप्पा स्वामींची संजीवणी दक्षीणमुखी भव्य शिवपिंडीवर चौदाघर मठ महीला भजनी मंडळ,गल्लीतील भावीक महीलांन कडुन



सामोहीक दुग्धाभिषेकाचे आयोजन १४ फेब्रुवारी शनिवारी रात्री ११:३० वा टाळ,मृदंग, झेंडे घेऊन भजन करत, डोक्यावर कळशी घेऊन भव्य मिरवणुक काढुन चौदाघर मठापासुन श्री झिंगणप्पा मठापर्यत मिरवणुक काढुन रात्री १२:०१मी दुग्धाभिषेक प्रारंभ होईल.

यात राचट्टेगल्ली, सराफ लाईन, झिंगणप्पा गल्ली आदी भागातुन महीला,भगीणी सहभाग घेणार आहेत यात जवळपास१००लीटर दुधाचा अभिषेक करण्याचा माणस आहे.

यावेळी गावभागातील युवकही मोठ्याप्रमाणात सहभागी होणार आहेत. सर्वमहीलांनी लहाण कळशी घेऊन,भजनी महीलांनी टाळमृदंगा सोबत रात्री ११वा.चौदाघर मठासमोर हजर रहावे असे आवहान श्री चौदाघर मठ महीला व युवक भजनी मंडळांनी आव्हाण केल आहे.

## नळेगाव जिल्हा परिषद गट मधून अमर पाटील तर नळेगाव पंचायत समिती गणातून शिवम देवशेटवार विजयी

**नळेगाव/अजगर मजकुरी :** नळेगाव जिल्हा परिषद गटात व गणात भाजप तर सुगाव गणात राष्ट्रवादी उमेदवार निवडून आले आहेत.विजयाचा जल्लोष करण्यात आला.



जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांसाठी झालेल्या निवडणुकीत नळेगाव जिल्हा परिषद गटात चुरशीची लढत झाली होती. भाजप,राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व जनता दल अशी चौरंगी लढत झाली. नळेगाव गटात एकुण मतदान २६ हजार ९३३ आहे. यापैकी १८ हजार ९९७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. यामध्ये भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अमर माणिकराव पाटील यांना आठ हजार १२९ मते मिळाली. अमर पाटील एक हजार ८४५ मतांनी विजयी झाले आहेत. काँग्रेसचे उमेदवार अनिल चव्हाण यांना सहा हजार २८४ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजी काळे यांना चार हजार ५६९ मते मिळाली आहेत. पंचायत समिती नळेगाव गणात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार शिवम देवशटवार यांना पाच हजार ३०६ मिळाली. शिवम देवशटवार दोन हजार ६९४ मतांनी विजयी झाले. काँग्रेसचे उमेदवार अमजद घोरवाडे दोन हजार ६१२ मत मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार खुददबोददीन घोरवाडे यांना ७५० मते, शिवसेना उमेदवार मेघराज बिराजदार यांना ५१,अपक्ष निलेश पाटील यांना ४६५ तर अपक्ष मुजम्मील पटवेकर यांना २५७ मते मिळाली आहेत.

सुगाव गणात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार भूजंग शिंदे यांना तीन हजार ६४२ मते मिळाली. भूजंग शिंदे केवळ १०८ मतांनी विजयी झाले आहेत. भारतीय जनता पक्षाचे अजय काळे यांना तीन हजार ५३४ ,काँग्रेसचे अशोक नागिमे यांना दोन हजार १६१,शिवसेना गोविंद बस्तापूरे यांना ११३ मते मिळाली आहेत.

## महाराजे ..

मज साठी पायपीट
कार्यकर्ते नीतझिजे
अहोरात्र कष्ट उपसे
ना जाणे कधी निजे

उपाशी पोटी मरमर
घास भर अन्न शिजे
कधी उन्हा तळमळे
कधी पावसा भिजे

कधीकुणी न थकले
सलाम त्यांच्या उर्जे
कुणीअपशब्द बोले
त्वरित हत्यारपारजे

कोरडा जरीही घसा
घोषणा देताना गर्जे
घोडागाडी नको उगे
सिमीत ठेवती गरजे

कार्यकर्त्या फक्तप्रेम
म्हणतो मावळेमाझे
होई सखा सहकारी
बोलतो त्यांनाचराजे

जीव त्यांचा मजवरी
असह्य स्नेहाचेओझे
दुःख मला अंमळही
का डोळे त्याचे सुजे

कार्यकर्ते सोबतीला
त्यांच्या मना विराजे
सोबती मीही त्यांचा
वाटले मज महाराजे

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## बारावी परीक्षेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे बारावी बोर्ड परीक्षेच्या पहिल्या दिवशी परीक्षा केंद्रावर संस्था आणि महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे प्रवेशद्वारावर गुलाब पुष्प देऊन मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शुभेच्छा देत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा तणाव कमी होऊन आत्मविश्वास वाढल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. परीक्षेसाठी आवश्यक सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून देत शिस्तबद्ध नियोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे सचिव शाम देशमुख यांनी यावेळी दिली.

भयमुक्त आणि तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी विद्यार्थ्यांना केले. परीक्षा ही तुमच्या ज्ञानाची चाचणी आहे, भीती निर्माण करणारी प्रक्रिया नव्हे. आत्मविश्वास ठेवा, वेळेचे योग्य नियोजन करा आणि शांत मनाने प्रश्नपत्रिका सोडवा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःवरील विश्वास यामुळे यश निश्चित मिळते, असे सांगत प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. परीक्षा केंद्रप्रमुख म्हणून प्रा. विवेक कदम, प्रा. सोपान डोपे, हनुमंत शिंदेहे काम पाहत आहेत.

यावेळी गणेश देशमुख,मुख्याध्यापक आरडी गायकवाड, पांडुरंग चेवले, डॉ. शहराज मुळे, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. महवीर कटके, डॉ. माना गायकवाड, प्रा. संदिपान चेवले, डॉ. विवेक जाधव, डॉ. अंगद कोते, डॉ. अजित भांजी,डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. कांतराव पोले, डॉ. पांडुरंग मुंढेयांनीही विद्यार्थ्यांना परीक्षा करिता शुभेच्छा दिल्या.

# भारताच्या आर्थिक उलाढालीत ॲनिमेशनचा मोठा वाटा : डॉ. दरगड

**लातूर/प्रतिनिधी:** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील ॲनिमेशन विभाग व नांदी फाउंडेशन - महिंद्रा प्राईड क्लासरूम (MPC) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप उत्साहात पार पडला. हा प्रशिक्षण कार्यक्रम २ ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आला.




समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जे. एस. दरगड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांची उपस्थिती अपेक्षित होती, मात्र अपरिहार्य कारणामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी शुभेच्छा संदेश पाठवून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी प्रमुख म्हणून उपस्थित होत्या. या प्रशिक्षणासाठी मुंबईहून आलेले प्रशिक्षक श्री. हकीम लकडवाला यांनी पाच दिवस विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्सचे सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी ॲनिमेशन विभाग प्रमुख डॉ. दुर्गा शर्मा यांनी नोकरीसाठी सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच विभागातील माजी विद्यार्थ्यांचा रोजगार व यशाचा आढावा उपस्थितांसमोर मांडून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमास मान्यवर म्हणून प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी श्री. अनिल बिरादार तसेच खट-उ समन्वयक डॉ. संतोष पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ॲनिमेशन विभागात करण्यात आले होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. जे. एस. दरगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संवाद कौशल्य, टीमवर्क, आत्मविश्वास, नेतृत्वगुण व व्यावसायिक शिस्त या सॉफ्ट स्किल्स करिअरसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. भारतातील ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग व डिजिटल मीडिया उद्योगाचा देशाच्या ऋड्ढ मध्ये वाढता वाटा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या क्षेत्रात वेगाने रोजगारनिर्मिती होत असून विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. अंजली जोशी यांनी शैक्षणिक ज्ञानासोबत सॉफ्ट स्किल्स आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या संधी अधिक व्यापक होतील, असे मत व्यक्त केले.

त्याचबरोबर झालेल्या ट्रेनिंग चे सर्टिफिकेट विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी हानी गायकवाड यांनी उपस्थित मान्यवर, प्रशिक्षक, नांदी फाउंडेशन, महिंद्रा प्राईड क्लासरूम आणि सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता गिरी या विद्यार्थिनीने केले. या समारोप कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअर, उद्योगातील संधी आणि कौशल्यविकासाबाबत नवी दिशा मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## Name of Change Declaration

I HAVE CHANGE MY NAME FROM SYED KASSIM SYED KHALIL AHMED TO SYED KASSIM KHALIL AHMED HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE. SUED KASSIM KHALIL AHMED IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
OLD NAME: SYED KASSIM SYED KHALIL AHMED
NEW NAME: SYED KASSIM KHALIL AHMED
ADDRESS: 1-1-568 NEAR VETERINARY HOSPITAL,SHIVAJI NAGAR,TQ ,NILANGA DIST-LATUR (M.S.) 413521

---

## Name of Change Declaration

I HAVE CHANGE MY NAME FROM SAYYAD ABDUL HAMEED ABDUL RAHIM HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE.SAYYAD ABDUL HAMID ABDUL RAHIM IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
OLD NAME: SAYYAD ABDUL HAMEED ABDUL RAHIM
NEW NAME: SAYYAD ABDUL HAMID ABDUL RAHIM
ADDRESS: BAUDHA NAGAR SALE GALLI,MAISUR COLONY LATUR (M.S.) 413512

---

## Name of Change Declaration

I HAVE CHANGE MY NAME FROM AKHALAKH CHANDPASHA PATEL HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE.AKHLAKH CHANDPASHA PATEL IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
OLD NAME: AKHALAKH CHANDPASHA PATEL
NEW NAME: AKHLAKH CHANDPASHA PATEL
ADDRESS: EK MINAR ROAD ,SAI BABA NAGAR,MAULANA SHIJAUDDIN COLONY,LATUR (M.S.) 413512

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that I have change My Name which was : **MULANI RAISABEGAM YUSUPHASAHEB**.
TO **RAISA ILAHI MULANI.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **RAISA ILAHI MULANI.** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **MULANI RAISABEGAM YUSUPHASAHEB**
NEW NAME:- **RAISA ILAHI MULANI.**
Address :- AT POST KARI,TQ. And DIST. SOLAPUR - 413404
AADHAR NO.- 431158536904
Mob. No.-9096539124

---

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that I have change My Name which was : **KOTWAD UTTARA KISHAN**. TO **KOTWAD UTTARA KISHANRAO.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **KOTWAD UTTARA KISHANRAO**. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KOTWAD UTTARA KISHAN.**
NEW NAME:- **KOTWAD UTTARA KISHANRAO.**
Address :- NETAJI NAGAR, NEAR COLLECTOR OFFICE.LATUR. TQ. AND DIST. LATUR -413512
AADHAR NO.- 423202533501
Mob. No.-8087658356

---

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that I have change My Name which was : **SHAIKH HASINA** TO **HASINABEGAM RABBANI SAYYAD.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **HASINABEGAM RABBANI SAYYAD** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SHAIKH HASINA.**
NEW NAME:- **HASINABEGAM RABBANI SAYYAD**.
Address :- SHIVAJI NAGAR, NILANGA. TQ.NILANGA, DIST. LATUR -413521
AADHAR NO.- 328471730440
Mob. No.-8380858056

---

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that I have change My Name which was : **SYED IRFAN RABBANI SAB** TO **IRFAN RABBANI SAYYAD.**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **IRFAN RABBANI SAYYAD** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SYED IRFAN RABBANI SAB.**
NEW NAME:- **IRFAN RABBANI SAYYAD.**
Address :- SHIVAJI NAGAR, NILANGA. TQ.NILANGA, DIST. LATUR -413521
AADHAR NO.- 872623050041
Mob. No.-8380858056

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६